# प्रकरण ११.
# सार्वजनिक वित्त





- देशाच्या आर्थिक विकास साध्य करतांना सरकारला विविध मार्गांनी उत्पन्न मिळवून सार्वजनिक विकासासाठी तो पैसा खर्च करावा लागतो. प्रशासकीय पातळीवरील या खर्च व उत्पन्न यांचा आढावा म्हणजे सार्वजनिक वित्त होय.

**सार्वजनिक वित्त**

- सार्वजनिक उत्पन्न
  - महसुली उत्पन्न
    - कर उत्पन्न
    - करेतर उत्पन्न
  - भांडवली उत्पन्न
    - गुंतवणूक
    - कर्ज उभारणी
- सार्वजनिक खर्च
  - योजना खर्च
  - योजनाबाह्य खर्च
    - विकासात्मक
    - बिगर विकासात्मक

## ➢ सार्वजनिक खर्च (Plan Expenditure) :-

१. प्रशासकीय व्यवस्थापन तसेच सामाजिक व आर्थिक कल्याण यासाठी सरकारकडून जो खर्च केला जातो, त्याला सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

### ❖ प्रकार :-

- १९८७ – ८८ पर्यंत सार्वजनिक खर्चाचे विकासात्मक व बिगर विकासात्मक असे वर्गीकरण केले जात असे. १९८७-८८ पासून सार्वजनिक खर्चाचे खालील दोन विभागात वर्गीकरण केले जाते.

१. **योजना खर्च** :– पंचवार्षिक योजनांमध्ये समाविष्ट सर्व विकास योजना किंवा कार्यक्रमासाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद म्हणजे योजना खर्च होय. नवीन विकासात्मक योजनावर होणारा हा खर्च असल्याने तो अर्थव्यवस्थेच्या विकासाला सहाय्यकच ठरतो.

२. **योजनाबाह्य खर्च** :-

A] **विकासात्मक खर्च** :- पूर्वी अंमलात आणलेल्या विकास योजना पुढे चालू ठेवणे किंवा अगोदरच जी विकासाची पातळी गाठली आहे, ती कायम ठेवणे. यासाठी होणारा खर्च हा विकासात्मक स्वरुपाचा योजनाबाह्य खर्च होय.

B] **बिगर विकासात्मक खर्च** :-

- संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, सार्वजनिक कर्जावरील व्याज, पगार, निवृत्ती वेतन, राज्य सरकारांना द्यावयाची योजनेतर अनुदाने व इतर महत्त्वांची अनुदाने इ. घटकांवर होणारा खर्च. हा खर्च बिगर विकासात्मक स्वरुपाचा खर्च मानला जातो.
- २०१७-१८ मध्ये सुमारे १२ लाख कोटी रुपये योजनेतर खर्च अंदाजित आहे. पैकी योजनेतर महसुली खर्च ११.६२ लाख कोटी रु. अंदाजित आहे. यापैकी केंद्र सरकारला द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा सुमारे ५.२३ लाख कोटी रुपये अंदाजित आहे. योजनेतर भांडवली खर्चाचा अंदाजित आकडा केवळ ३८,७८० कोटी रुपये आहे.

## ➢ सार्वजनिक खर्चासंबंधीची रंगराजन समिती :-

- PMEAC चे तत्कालीन चेअरमन सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक खर्च व त्याच्या नोंदी याबाबत शिफारशी करण्यासाठी (Recommendations on Public Expenditure) २०११ साली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सार्वजनिक खर्चाबरोबर एकूणच अर्थसंकल्पीय तरतूदींच्या बाबत शिफारशी सादर केल्या आहेत.

### ❖ महत्वाच्या शिफारशी :-

१. सार्वजनिक खर्चाबाबतचे योजना खर्च व योजनाबाह्य खर्च हे वर्गीकरण बंद करावे. त्याऐवजी केवळ 'महसूली खर्च' व 'भांडवली खर्च' असे वर्गीकरण करावे.
२. पंचवार्षिक योजनांचा आराखडा तयार करण्यासाठी जबाबदारी नियोजन आयोगाकडे ठेऊन वार्षिक अंदाजपत्रक निर्मितीची जबाबदारी पूर्णपणे अर्थमंत्रालयाकडे सोपवावी. मात्र अर्थमंत्रालय अंदाजपत्रक तयार करतांना नियोजन आयोगाच्या नोंदी किंवा शिफारशी विचारात घेईल.
३. अंदाजपत्रक तयार करतांना केवळ एक वर्षापुरता दृष्टीकोन न ठेवता आगामी अनेक वर्षाचे उद्दिष्ट ठरवावे. तसेच केवळ अंदाजपत्रकीय तरतूदींना महत्व न देता भौतिकी उद्दिष्टे व प्रत्यक्ष परिणाम यांनाही महत्त्व द्यावे.
४. केंद्राकडून राज्यांना दिल्या जाणाऱ्या महसूलामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने लेखानिर्मितीच्या तरतूदींमध्ये सुधारणा करणे.
५. सार्वजनिक खर्चामध्ये पारदर्शकता आणण्याच्या हेतूने Central Plan Monitoring System बळकट करणे, नागरिकांना संसाधनांच्या वापराबाबत माहिती विचारण्याचा अधिकार देणे.

## ❖ सार्वजनिक तूट :-

- सार्वजनिक पातळीवरील खर्चापेक्षा उत्पन्न कमी असणे म्हणजे सार्वजनिक तूट होय. सार्वजनिक तूट चलननिर्मितीला व पर्यायाने किंमतवाढीला कारणीभूत ठरते. त्यामुळे सार्वजनिक तूट नियंत्रित ठेवणे हा वित्तीय धोरणाचा एक महत्त्वाचा भाग असतो. परंतु ही तूट दरवर्षी वाढत चालली असल्याचेच लक्षात येते.

### ❑ तूटविषयक महत्त्वाच्या संकल्पना :-

१. महसुली तूट :-

- महसुली खर्च व महसुली जमा यातील फरकास महसुल तूट असे संबोधले जाते. राजकोषीय तूटीत महसूली तूट अंतर्भूत होत असते.
- २०१७-१८ मध्ये ही तूट ३,२१,१६३ कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. २०१७-१८ च्या अंदाजित GDP शी (१,६८,४७,४५५ कोटी रु.) या तुटीचे प्रमाण काढले तर ते १.९% भरते. '१.९% ही २०१७-१८ ची अंदाजित महसूली तूट होय.'
- महसुली तूट = महसुली जमा – महसुली खर्च

२. राजकोषीय / वित्तीय तूट :-

- राजकोषीय तूट म्हणजे शासनाने आपल्या मिळकतीपेक्षा केलेला अतिरिक्त खर्च होय. शासनाच्या एकूण खर्चातून एकूण महसुली जमा, कर्जाची वसुली आणि इतर जमा यांची वजाबाकी केल्यास राजकोषीय तूट मिळते.
- सूत्र : राजकोषीय तूट = एकूण खर्च – (महसुली जमा + बिगरकर्ज भांडवली जमा) किंवा
  राजकोषीय तूट = एकूण खर्च – (महसुली जमा + कर्जवसुली + इतर येणे)
- राजकोषीय तूट ही कर्जाच्या माध्यमातून भरुन काढली जात असल्याने तिला सार्वजनिक कर्ज निर्माण करणारी तूट असेही म्हणतात. २०१७-१८ मध्ये ५,४६,५३२ कोटी रुपयांची म्हणजे GDP च्या ३.२ राजकोषीय तूट राहण्याचा अंदाज आहे.

३. अंदाजपत्रकीय तुट :-

- १९९८ पासून अंदाजपत्रकीय तुट सध्या नेहमी शून्यच दाखविली जाते. कारण अंदाजपत्रकीय तूट ही तूटीचा अर्थभरण्यातून पूर्ण करावी लागते. हा प्रकार महागाईला कारणीभूत ठरतो.
- सूत्र = अंदाजपत्रकीय तूट = अंदाजपत्रकीय खर्च - अंदाजपत्रकीय जमा

४. प्राथमिक तूट (Primary Deficit) :-

- १९९२-९३ पासून प्राथमिक तूट मोजण्यास सुरुवात झाली. राजकोषीय तूटीतून व्याज प्रदान रकमा वजा केली असता येणारी तूट म्हणजे प्राथमिक तूट होय.
- सूत्र = प्राथमिक तूट = राजकोषीय तूट - व्याज देयता
- २०१७-१८ मध्ये २३,४५४ कोटी रुपये म्हणजे GDP च्या ०.१% प्राथमिक तुटीचा अंदाज आहे.

## ❖ तूटीचा अर्थभरणा :-

- शासनाचा चालू महसूल आणि बँकांखेरीज इतरांकडून उभी केलेली कर्जे या दोन्हींच्या बेरजेपेक्षा सरकारचा एकूण खर्च जितका अधिक असेल, त्याची तरतूद करणे म्हणजे त्याला तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात. तूटीचा अर्थभरणा करतांना लोकांकडून उभारले जाणारे कर्ज विचारात घेतले जात नाही.
- तुटीचा अर्थभरणा नेहमी चलन निर्मितीच्या माध्यमातूनच केला जातो व ते करण्याची जबाबदारी आर.बी.आय. ची असते. १९९८ पासून सुकुमॉय चक्रवर्ती समितीच्या शिफारशीनुसार तुटीचा अर्थ भरण्याची पद्धत बंद करण्यात आली आहे. बी.आर. शेणॉय यांच्या म्हणण्यानुसार तूटीचा अर्थभरणा हा अग्निप्रमाणे उत्तम नोकर परंतु दुष्ट मालक असतो.

### ❑ धोके :-

१. तूटीचा अर्थभरणा भरमसाठ भाववाढीस कारणीभूत ठरतो.
२. पतनिर्मितीमध्ये अवास्तव वाढ घडून येते.
३. शासनाकडून पैशाचा गैरवापर केला जाऊ शकतो.
४. गुंतवणूक रचनेत बदल घडून येतो.

## ❖ राजकोषिय दायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा (FRBM Act, २००३) :-

- ५ जुलै २००४ पासून हा कायदा लागू करण्यात आला. वित्तीय जबाबदारी व आर्थिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून २००९ पर्यंत महसूली तूट शून्यावर आणणे तसेच राजकोषीय तूट ३ टक्क्यांपर्यंत कमी करणे हे उद्दिष्ट होते. याबाबत श्री विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली Task Force नेमण्यात आला होता.
- २००७-०८ मध्ये महसूली तूट १ टक्क्यापर्यंत तर राजकोषीय तूट ३.१ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यश मिळाले. परंतु २००८ मधील जागतिक आर्थिक मंदीमुळे वित्तीय व्यवस्थापनांचे धोरण पूर्णपणे फिस्कटले. २०१२-१३ च्या अर्थसंकल्पामध्ये FRBM Act ची नव्याने अंमलबजावणी करण्याचे धोरण स्विकारण्यात आले आहे. त्याअंतर्गत Effective Revenue Deficit व Mid Term Expenditure Framework या दोन नवीन संकल्पना मांडण्यात आल्या.

# अर्थसंकल्प




## ❖ अर्थ व व्याख्या :-

- अर्थसंकल्पाला इंग्रजीमध्ये बजेट असे म्हणतात. बजेट हा शब्द Bougettee या फ्रेंच शब्दापासून निर्माण झाला. त्याचा अर्थ 'चामडयाची पिशवी' असा होतो. 'बजेट' हा शब्द इंग्लंडमध्ये सर्व प्रथम १७३३ मध्ये वापरण्यात आला.
- अर्थसंकल्पाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल. "पुढील आर्थिक वर्षाच्या शासकीय जमा-खर्चाच्या कायदेमंडळापुढे विचारार्थ ठेवावयाच्या प्राथमिक स्वरुपातील योजनांचा व शिफारसींचा समावेश ज्या कागदपत्रात केलेला असतो त्यास बजेट किंवा अर्थसंकल्प असे म्हणतात."
- भारतातील अर्थसंकल्पीय प्रक्रिया स्वातंत्र्यापूर्वीच सुरु झाली आहे. ईस्ट इंडियाकडून भारताची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटकडे गेल्यानंतर लगेचच दोन वर्षानंतर ७ एप्रिल, १८६० रोजी पहिला अर्थसंकल्प मांडण्यात आला. जेम्स विल्सन या पहिल्या वित्त सदस्याने तो मांडला होता. स्वातंत्र्यापूर्वीच्या अंतरिम सरकारमधील सदस्य लियाकत अली खान यांनी १९४७ – ४८ चा अर्थसंकल्प मांडला होता. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले वित्तमंत्री श्री. आर. के. शण्मुखम चेट्टी यांनी पहिला अर्थसंकल्प २६ नोव्हेंबर, १९४७ रोजी मांडला.
- घटनेतील कलम ११२ मध्ये यासाठी वार्षिक आर्थिक विवरण पत्र हा शब्द वापरलेला आहे. अंदाजपत्रकातील सांख्यिकी माहितीचा तक्ता तीन विभागात सादर केला जातो.
    - सरकारच्या गतवर्षीच्या जमाखर्चाची सुधारित आकडेवारी (Actuals)
    - चालू वित्तीय वर्ष संपत असतानांचे सुधारित अंदाज (Revised Estimates)
    - आगामी वित्त वर्षातील जमाखर्चासंबंधी प्रस्तावित अंदाज (Budgetory Estimates)
- भारतात दरवर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेचे बजेट अधिवेशन सुरु होते. ते साधारणत: मे महिन्यापर्यंत चालते. दरवर्षी पुढील आर्थिक वर्षासाठी फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी (२८/२९ फेब्रुवारी) साधारण अर्थसंकल्प संसदेत मांडला जातो. साधारणत: त्याच्या एक दिवस आधी चालू वर्षाची भारताची आर्थिक पाहणी संसदेत मांडली जाते. साधारणत: २५/२६ फेब्रुवारीला पुढील आर्थिक वर्षासाठी रेल्वेचा अर्थसंकल्प मांडला जातो. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल व त्याच्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय अर्थ संकल्प सादर केला जातो. त्यानंतरच राज्यांचे अर्थसंकल्प सादर होत असतात. केंद्रीय व राज्यांचे अर्थसंकल्प राष्ट्रपती व राज्यपाल यांचे प्रतिनिधी म्हणून संबंधित अर्थमंत्री सादर करतात.

- १९२१ च्या ॲकवर्थ समितीच्या शिफारशीनुसार १९२४ पासून रेल्वेचा अर्थसंकल्प साधारण अर्थसंकल्पापासून वेगळा मांडला जातो. मार्चचा महिना दोन्ही अर्थसंकल्पांना संसदेची कायदेशीर मान्यता मिळविण्यासाठी राखून ठेवलेला असतो. मात्र अशी कायदेशीर मान्यता मिळण्यासाठी बऱ्याचदा मे महिना उजाडतो.
- भारत सरकारचे आर्थिक / वित्तीय वर्ष दरवर्षी १ एप्रिल पासून सुरु होते. अर्थसंकल्प संमत झाल्यानंतर तो १ एप्रिल ते ३१ मार्च या वित्तीय वर्षासाठी कार्यान्वित केला जातो. १ एप्रिल ते ३१ मार्च असे वित्तीय वर्ष मानण्यास सुरुवात १८६७ पासून झाली. त्यापूर्वी १ मे ते ३० एप्रिल असे वित्तीय वर्ष मानले जात असे.
- पुढे मे १९८४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या एल्.के.झा समिती ला वित्तीय वर्षाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यास सांगण्यात आले. या समितीने वित्तीय वर्ष १ जानेवारीपासून गृहीत धरण्याची शिफारस केली होती. भारत सरकारने मात्र ही शिफारस विविध कारणांमुळे काही स्विकारली नाही.

## ❖ अर्थसंकल्पीय प्रक्रिया व घटनात्मक तरतुदी : -

१. अर्थसंकल्पाच्या एका वर्षाच्या अस्तित्वात पुढील चार अवस्था येतात –
२. अर्थसंकल्प तयार करणे.
३. अर्थसंकल्पास कायदेशीर रुप देणे.
४. अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करणे.
५. राष्ट्रीय वित्तावर नियंत्रण – लेखा व लेखापरीक्षण

### १. अर्थसंकल्प तयार करणे :-

- घटनेच्या ११२ व्या कलमानुसार केंद्र सरकारचा तर २०२ व्या कलमानुसार राज्य सरकारचा अर्थसंकल्प मांडला जातो.
- अर्थसंकल्प वित्त मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या आर्थिक कामकाज विभागामार्फत तयार केला जातो. मात्र ११२ व्या कलमानुसार प्रत्येक आर्थिक वर्षासाठी तयार केलेले हे बजेट संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचे घडवून आणण्याचे कार्य राष्ट्रपतींचे आहे. २०२ व्या कलमानुसार ते कार्य राज्यांच्या राज्यपालाचे आहे.
- **अर्थसंकल्प तयार करण्यास ४ घटक मदत करतात :**
  i. अर्थमंत्रालय
  ii. विविध प्रशासकीय कार्यालये
  iii. नियोजन मंडळ
  iv. महालेखापाल (CAG)
- **अर्थसंकल्प तयार करण्याचे टप्पे :-**

i. अर्थसंकल्पीय अंदाज बांधण्याचे कार्य मागील वर्षी जुन - जुलै मध्ये सुरु होते.
ii. प्रत्येक मंत्रालयातील विविध खात्यांमार्फत / कार्यालयांमार्फत त्याच्या पुढील वर्षातील अपेक्षित खर्चासंबंधीचे अंदाज बांधले जातात. (खालीलप्रमाणे ३ भागात –
अ. उत्पन्न व स्थायी खर्च उदा. वेतन, प्रवास भत्ते इत्यादी.
ब. खर्चात चढ - उतार होत असलेल्या सेवांवरील खर्च उदा. साधन सामुग्री खरेदी
क. नवीन योजना अथवा खर्चाचा समावेश उदा. नवीन इमारत बांधणे. अशा प्रकारचे नमुनापत्रक त्यांना अर्थमंत्रालयामार्फत पुरविण्यात येते.
iii. अशा प्रकारचे प्रत्येक खात्याचे अंदाज अहवाल आपापल्या मंत्रालयाकडे ऑक्टोबरच्या सुरुवातीला येतात. त्यानंतर मंत्रालय प्रत्येक खात्याचा एकत्रित अर्थसंकल्प तयार करतात.
iv. असे विविध खात्यांचे अर्थसंकल्प नोव्हेंबर मध्ये अर्थमंत्रालयाकडे येतात.
v. नियोजन मंडळ पंचवार्षिक योजनेत अग्रक्रम दिलेल्या योजनांच्या दृष्टीने डिसेंबरमध्ये त्याविषयीचे आपले मत कळवित असते. डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत प्राथमिक अवस्था संपल्यानंतर अर्थमंत्रालय अर्थसंकल्पाने पुनर्वगीकरण करते. यालाच साधारण अर्थसंकल्प असे म्हणतात.
vi. महालेखापालाच्या दुरुस्तीनंतर दुसरी आवृत्ती तयार होते. त्यानंतर अर्थमंत्री याबाबत पंतप्रधानांनी चर्चा करतो व कॅबिनेटची संमती घेऊन संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी सादर करतो.

### २. अर्थसंकल्पास कायदेशीर रुप देणे :-

- अर्थसंकल्पातील सरकारचा करप्रस्ताव व सरकारच्या नियोजित खर्चासाठी भारताच्या संचित निधीतून पैसे काढण्यासाठी लोकसभेची संमती मिळविणे म्हणजे अर्थसंकल्पास कायदेशीर रुप देणे होय. यात पुढील टप्पे येतात –

i. अर्थमंत्री प्रथम लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतात व अर्थसंकल्पीय भाषण करतात. भाषणाचे दोन भाग असतात. भाग 'अ' मध्ये देशाची साधारण आर्थिक पाहणी असते, तर भाग 'ब' मध्ये सरकारचा कर प्रस्ताव असतो. भाषणानंतर अर्थसंकल्प राज्यसभेत मांडला जातो.

i. त्यानंतर दोन्ही सभागृहात आठवडाभर अर्थसंकल्पावर ढोबळ मानाने चर्चा चालते. या चर्चेनंतर राज्यसभेचे कार्य संपते. अर्थसंकल्पाला कायदेशीर रुप देण्याचे सर्व पुढील कार्य लोकसभेत चालते.

- अनुदानाच्या मागणींवर चर्चा व मतदान :-

i. लोकसभेत प्रत्येक मंत्रालयाने / खात्याने केलेल्या स्वतंत्र अनुदानाच्या मागणीवर प्रथम चर्चा व नंतर मतदान घेतले जाते. सर्वसाधारणपणे १०९ मागण्या असतात. त्यांपैकी १०३ नागरी प्रशासनाच्या व ६ संरक्षणाच्या असतात.

ii. घटनेच्या ११२ व ११३ व्या कलमानुसार अर्थसंकल्पातील नियोजित खर्च दोन प्रकारचे असतात.

**अ. भारताच्या संचित निधीवर प्रभारित खर्च :-** हे खर्च संचित निधीतून करण्याचे व घटनेनेच ग्राह्य मानलेले खर्च असतात. त्यांच्यावर मतदान घेतले जात नाही. उदा.

i. राष्ट्रपतीचे पगार व भत्ते व त्यांच्या ऑफिसचा खर्च
ii. लोकसभा व राज्यसभेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचे पगार व भत्ते.
iii. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार, भत्ते व पेन्शन
iv. उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांचे पेन्शन
v. भारताचा महालेखापालाचे पगार, भत्ते, पेन्शन
vi. संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांचे पगार, भत्ते व पेन्शन.
vii. सर्वोच्च न्यायालय, भारताचे महालेखापाल व संघ लोक सेवा आयोग, यांचा प्रशासकीय खर्च, तसेच या कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांचे पगार, भत्ते व पेन्शन.
viii. भारत सरकार देय असलेल्या कर्जावरील व्याज, सिंकिंग फंड यांसारखे चार्जेस.

**ब. प्रत्येक मंत्रालयाची / खात्याची अनुदानाची मागणी :-**हा खर्च सुद्धा संचित निधीतून करावयाचा असतो. मात्र ह्यासाठी लोकसभेत मतदान घेतले जाते. लोकसभेच्या संमतीशिवाय या खर्चासाठी एक रुपया सुद्धा संचित निधीतून काढता येत नाही.

**क. कपात प्रस्ताव :-**

- मतदानाप्रसंगी लोकसभेतील प्रत्येक सदस्याला सरकारने केलेल्या या अनुदानाच्या मागणीत कपात सुचना मांडण्याचा अधिकार असतो. अशा कपात प्रस्तावाचे तीन प्रकार असतात –

१. काटकसर कपात :-
- अनुदानाच्या मागणीतील रक्कमेपैकी काही विशिष्ट रक्कम कमी करण्यात यावी ही मागणी.
- मात्र त्या सदस्यांला या कपातीमुळे काटकसर कशी होईल हे दाखवून द्यावे लागते.

२. धोरणात्मक कपात :-
- अनुदानाची मागणी ज्या धोरणावर आधारित असेल त्या धोरणाच्या अमान्यतेविषयी प्रस्ताव
- "अनुदानाच्या मागणीची रक्कम एक रुपयापर्यंत कमी करण्यात यावी" असा तो प्रस्ताव असतो.

३. प्रतिकात्मक कपात :-
- जनतेचा एखादा प्रश्न, ज्यासाठी भारत सरकार जबाबदार आहे, लोकसभेसमोर व पर्यायाने देशासमोर आणण्यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो.
- "अनुदानाच्या मागणीच्या रकमेतून १०० रुपये कमी करण्यात यावे" असा तो प्रस्ताव असतो.
- या अनुदानाच्या मागण्या मान्य करण्यासाठी साधारणत: २६ दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात येतो. मात्र प्रत्यक्षात हे वेळापत्रक न पाळले जात, शेवटच्या दिवशी चर्चा / टिका झालेली असो अथवा नसो, या मागण्या मतदानाद्वारे संमत केल्या जातात. या प्रक्रियेला Guillotine असे म्हणतात.

४. वार्षिक वित्तीयक विधेयक :-
- लोकसभेत अर्थसंकल्प मांडल्यावर लगेचच हे विधेयक मांडले जाते. यात सरकारचे सर्व वित्तीय प्रस्ताव (उदा. नियोजित कर आकारणी) असतात. या प्रस्तावांना लोकसभेची संमती घेण्यासाठी हे विधेयक मांडले जाते. हे विधेयक मांडल्यापासून ७५ दिवसांच्या आत संसदेने ते संमत करुन राष्ट्रपतीची संमती मिळणे आवश्यक असते.
- वरील दोन्ही विधेयक धन विधेयके असतात. लोकसभेने संमत केल्यानंतर ते राज्यसभेला सादर केले जातात. राज्यसभेला १४ दिवसांच्या आत ते संमत करावे लागतात.

## ❖ इतर काही विशिष्ट अनुदानाच्या मागण्या :-

### १. पूरक अनुदान मागणी:-

- संसदेने कोणत्याही बाबींसाठी संमत केलेल्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च तिच्यावर करु शकत नाही. मात्र एखाद्या बाबीवरील संमत रक्कम अपुरी ठरली किंवा अशी नवीन खर्चाची बाब उद्‌भवली जिचा समावेश अर्थसंकल्पात नव्हता, तर अशा खर्चासाठी (त्या आर्थिक वर्षासाठी) राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे पूरक अनुदानाची मागणी मांडण्याचे घडवून आणतो. (कलम ११५)

### २. वाढीव अनुदानाची मागणी :-

- एखाद्या आर्थिक वर्षात जर एखाद्या बाबतीवरील खर्च तिच्यावरील संमत रकमेपेक्षा जास्त ठरला तर त्यासाठी राष्ट्रपती वाढीव अनुदानाची मागणी मांडण्याचे घडवून आणतात. असा वाढीव खर्च CAG मार्फत संसदेच्या ध्यानात आणून दिला जातो. वाढीव अनुदानाची मागणी प्रत्यक्ष खर्च होऊन गेल्यानंतर व संबंधित आर्थिक वर्ष संपल्यानंतर केली जाते.

### ३. लेखानुदान :-

- आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच अनुदानाच्या मागण्या, विनियोजन तसेच वित्तीय विधेयके संमत होणे अपेक्षित असते. मात्र बऱ्याच वेळा आर्थिक वर्ष सुरु होऊन बरेच दिवस होऊन गेले असतांनाही ह्या बाबी संमत झालेल्या नसतात. अशावेळी प्रशासनाचा खर्च भागविण्यासाठी आर्थिक वर्षाच्या कोणत्याही कालावधीसाठी आवश्यक तेवढे अनुदान सरकारला संमत करण्यासाठी लोकसभेत लेखानुदान मांडण्याची व्यवस्था घटनेने केली आहे. (कलम ११६)
- साधारणतः दोन महिन्यांसाठी वार्षिक अंदाज खर्चापैकी १/६ खर्चाच्या मागणीसाठी लेखानुदान मांडले जाते. निवडणूक वर्षामध्ये ते ३ ते ४ महिन्यांसाठीही मांडले जाऊ शकते. लेखानुदान लोकसभेत अर्थसंकल्पावरील साधारण ढोबळ चर्चेनंतर आणि अनुदानांच्या मागणीवरील चर्चा व मतदानापूर्वी मांडले जाते व सहसा लोकसभेत चर्चेविना संमत केले जाते.

### ४. पत - अनुदान :-

- एखाद्या राष्ट्रीय पेच प्रसंगाच्या वेळी (उदा. युद्ध, मोठी नैसर्गिक आपत्ती) अनुपेक्षितरित्या उद्‌भवलेला खर्च, ज्याचे काटेकोर अंदाज करता येणे शक्य नाही, भागविण्यासाठी एका मोठ्या ठोक रकमेची मागणी करण्यासाठी पत - अनुदान लोकसभेत मांडण्यात येते. (कलम ११६)

## ❖ केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांचे निधी :-

- केंद्र सरकार तसेच सर्व राज्य सरकारे यांना खालील तीन निधी निर्माण करावे लागतात : -
  - i. भारताचा / राज्याचा संचित व एकत्रित निधी
  - ii. भारताचे / राज्याचे सार्वजनिक लेखे
  - iii. भारताचा / राज्याचा आकस्मिक खर्च निधी
- केंद्र सरकार / राज्य सरकारला मिळालेला सर्व पैसा पहिल्या दोन निधींपैकी एकात टाकला जातो.

### १. भारताचा / राज्याचा संचित व एकत्रित निधी :–

- निर्मिती - कलम २६६ (१) नुसार
- या निधीत पुढील मिळकत ठेवली जाते -
  - i. सरकारला मिळालेले सर्व कर उत्पन्न,
  - ii. सरकारने घेतलेली सर्व कर्जे,
  - iii. सरकारने दिलेल्या कर्जाची आलेली परतफेड
  - iv. सार्वजनिक उद्योगांचा नफा
- या निधीतून मिळवायचा पैसा लोकसभेच्या / विधानसभेच्या संमतीशिवाय प्राप्त करता येत नाही.

### २. भारताचे / राज्याचे सार्वजनिक लेखे :-

- यांना लोक लेखे असेही म्हणतात.
- निर्मिती : कलम २६६ (२) नुसार
- सरकारला वरील पैशांव्यतिरिक्त मिळालेला पैसा या निधीत ठेवला जातो. उदा. पेन्शन निधी, प्रॉव्हिडंट निधीचा पैसा, जनतेच्या अल्प बचती (NSC, IVP, KVP, पोस्टातील बचती इ.)
- हे पैसे सरकार वापरीत असते, मात्र ते सरकारच्या मालकीचे नसतात. कालांतराने ते पैसे ज्यांचे आहे त्यांना परत द्यावे लागतात. त्यामुळे हे पैसे या निधीतून काढण्यासाठी संसदेची मान्यता घेण्याची आवश्यकता नसते. अशा रितीने सरकार या पैशाबाबत एका बँकर सारखे कार्य करीत असते.

### ३. भारताच्या / राज्याचा आकस्मिक खर्च निधी :-

- निर्मिती : कलम २६७ नुसार, संसद / राज्य विधीमंडळाच्या कायद्यानुसार
- आकस्मिकरित्या उद्‌भवलेला खर्च भागविण्यासाठी हा निधी निर्माण करण्यात येतो. संसदेच्या / विधीमंडळाच्या कायद्याने ठरविल्याप्रमाणे विशिष्ट रक्कम वेळोवेळी या निधीत ठेवण्यात येते.
- खर्च करतेवेळी संसदेची संमती घेण्याची आवश्यकता नसते, मात्र त्यानंतरच्या पहिल्या संसदेच्या अधिवेशनात या खर्चाची संमती घ्यावी लागते. संसदेने या खर्चास मान्यता दिल्यास खर्च झालेल्या रकमेएवढी रक्कम संचित निधीतून काढून आकस्मिक खर्च निधीत टाकली जाते. हा निधी राष्ट्रपती / राज्यपालाच्या ताब्यात असतो.

## अंदाजपत्रकाचे प्रकार

| | शिलकीचे अंदाजपत्रक | तुटीचे अंदाजपत्रक |
|---|---|---|
| | • अशा अंदाजपत्रकामध्ये खर्चापेक्षा जमा जास्त असते. सरकार भाववाढीवरील नियंत्रण ठेवण्यासाठी शिलकीचे अंदाजपत्रकसादर केले जाते.<br>• उत्पन्न > खर्च | • यामध्ये जमेपेक्षा खर्च जास्त असतो. अशावेळी शासन तूट भरुन काढण्यासाठी नवीन कर आकारणी, कर्ज घेणे, चलननिर्मिती करणे इ. मार्गाचा अवलंब करते. अर्थव्यवस्थेत मंदी निर्माण झाली असल्यास ती दूर करण्यासाठी तसेच आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी तुटीचे अंदाजपत्रक सादर केले जाते. सामान्य स्थितीत तुटीचे अंदाजपत्रक भाववाढीला कारणीभूत ठरते.<br>• .उत्पन्न < खर्च |
| **अनुकुल परिणाम** | १. देशाचे आंतरराष्ट्रीय पत सुधारते.<br>२. वस्तु व सेवांचे किंमती नियंत्रित होतात.<br>३. सार्वजनिक खर्च व कर्ज नियंत्रित होते.<br>४. अर्थव्यवस्थेतील तेजी कमी होण्यास मदत होते. | १. आर्थिक विकासाची गती वाढते.<br>२. औद्योगिक विकासाचा दर उंचावतो.<br>३. रोजगारात वाढ होते.<br>४. अर्थव्यवस्थेतील मंदी दूर होण्यास मदत. |
| **प्रतिकुल परिणाम** | १. आर्थिक विकासाचा दर कमी होतो.<br>२. औद्योगिक विकासाची गती खालावते.<br>३. रोजगारात घट होते.<br>४. अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची शक्यता | १. सार्वजनिक खर्च व कर्जात भरमसाठ वाढ<br>२. वस्तु व सेवांच्या किंमतीत भरमसाठ वाढ<br>३. महागाईचा दर उंचावणे. |

## ❖ फलनिष्पत्ती अर्थसंकल्प :-

- अंदाजपत्रकाची मांडणी करताना आर्थिक तरतूदींच्या (Outlay) आधारे केवळ भौतिक परिणामांची (Ouputs) उदिष्टे न ठेवता प्रत्यक्ष परिणामांची म्हणजेच फलनिष्पत्तीची (Outcomes) चर्चा करणारे अंदाजपत्रक म्हणजेच फलनिष्पत्ती अंदाजपत्रक होय. नवीन अंदाजपत्रकाच्या अगोदर हे फलनिष्पत्ती अंदाजपत्रक मांडले जाते.
- या अंदाजपत्रकात वित्तीय तरतूदींबरोबरच त्यातून साध्य करावयाची उद्दिष्टे किंवा परिणाम निश्चित केलेली असतात. फलनिष्पत्ती अंदाजपत्रकाची सुरुवात पी. चिदंबरम् यांनी २००५ मध्ये केली. २००५-०६ मध्ये त्यांनी पहिला फलनिष्पत्ती अर्थसंकल्प सादर केला होता. प्रत्येक मंत्रालय तसेच विभागांतर्फे दरवर्षी विविध विकास योजनांबाबत फलनिष्पत्ती अहवाल सादर केला जातो.

## ❖ लिंगाधारित अर्थसंकल्प २००५-०६ :-

- प्रत्येक क्षेत्रातील आर्थिक तरतूदीचे स्त्री-पुरुष घटकांनुसार विभाजन करणे म्हणजे लिंगाधारित अंदाजपत्रक होय. आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांवर होणारा अन्याय दूर करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे या हेतूने हा अर्थसंकल्प सादर केला जातो. याची सुरुवात पी चिदंबरम् यांनीच २००५-०६ मध्ये केली होती.

### ❑ कामगिरी अर्थसंकल्प / अंदाजपत्रक कार्यवाही :-

- ज्या अंदाजपत्रकात विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणारा निधी आणि आवश्यक खर्च यांचे विश्लेषण केलेले असते आणि या कार्यक्रमाची पूर्तता किती साध्य झाली याच्या मापनासाठी आवश्यक ती सांख्यिकी दिलेली असते. त्या अंदाजपत्रकाला कामगिरी आधारावर अर्थसंकल्प असे म्हणतात.

### ❑ कामगिरी आधारावर अंदाजपत्रकात पुढील तीन घटकांचा समावेश होतो.

१. शासकीय कामकाज विषयक कार्यक्रम आणि कृती कार्यक्रम
२. प्रत्यक्ष कार्याचे मापन
३. कार्याचा अहवाल

### ❑ कामगिरी आधारावर अंदाजपत्रक तयार करताना पुढील बाबी विचारात घेतल्या जातात.

१. प्रत्येक कार्यक्रमाची निश्चित उद्विष्टे मोजणीक्षम पद्धतीने मांडावी.
२. उद्देश साध्य करण्यासाठी कोणते मार्ग स्विकारावेत, त्याचा लाभ खर्च इत्यादीचे विश्लेषण केले जावे.
३. प्रत्येक योजनेचे अर्थसंकल्पीय वर्गीकरण करावे.
४. कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये सहभागी संस्थामध्ये सुसुत्रीकरण करणे.
५. कार्यक्रमाची उद्दिष्टे कितपत साध्य याचे मुल्यमापन करावे.

## ❖ शून्याधारीत अर्थसंकल्प (Zero – Base Budgeting) :-



- शून्याधारीत अर्थसंकल्प जनक – पीटर पिहर हे आहेत. शून्याधारीत अर्थसंकल्पाचे सर्वप्रथम अमेरिकेत १९७३ मध्ये राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी जॉर्जीया येथे अवलंब केला.
- भारतात या अर्थसंकल्पाचे उपयोग १९६८-६९ मध्ये करण्यात आला. महाराष्ट्राने १९८७-८८ मध्ये भारतात पहिल्यांदा ही संकल्पना राबवली, पंरतु अयशस्वी ठरली. त्यावेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण तर वित्तमंत्री सुशीलकुमार शिंदे होते.
- त्यानंतर आंध्र प्रदेशाने या पद्धतीचा स्विकार केला. भारतात प्रशासकीय स्तरावर यांची अंमलबजावणी होऊ न शकल्यामुळे ही संकल्पना मागे पडली.

❑ **व्याख्या :** " ज्या अंदाजपत्रकात प्रकल्पाचा सुरुवातीपासूनचा खर्च मांडलेला असतो व ते अंदाजपत्रक नियोजित स्वरुपाचे असून त्याचा प्रत्यक्ष उपयोग केला जातो. त्या अंदाजपत्रकाला शून्याधारीत अंदाजपत्रक असे म्हणतात.————पिटर पिहर

❑ **वैशिष्टे :-**

१. भिन्न पातळीवर निधीची उपलब्धता आणि कार्यक्षमता विचारात घेऊन कार्यक्रमांचे तुलनात्मक परीक्षण करणे.
२. प्रत्येक स्तरावर कार्यसंस्थेसाठी उद्दिष्टये ठरविली जातात.
३. निर्णय गटांचे महत्त्व विचारात घेऊन त्यांची विभागणी भिन्नपातळीवर केली जाते.
४. किमान उद्दिष्टये साध्य करण्यासाठी किती निधीची गरज असेल याचे प्रमाण निश्चित करता येते.
५. कार्यक्रम स्तर व किमान प्रयत्न स्तर यांची रचना करुन छेदबिंदू ठरविला जातो.
६. शेवटी छेद बिंदू खालील नियोजन किंवा प्रकल्प रद्द केला जातो.




❑ **शून्यधारीत अर्थसंकल्पाचे फायदे :-**

१. अग्रक्रम, गरजा, उद्दिष्टे यांना महत्त्व देता येते.
२. प्रत्येक घटकाला समान महत्त्व देणे शक्य असते.
३. प्रकल्प खर्च आणि त्याची गरज याचे परीक्षण केले जाते. त्यामुळे खर्चाविषयी जागरुकता वाढते.
४. निधीच्या उपलब्धतेनुसार अर्थसंकल्पात बदल करणे शक्य होते. चालू योजना आणि नवीन प्रस्तावित योजना यांचे परिक्षण समान चिकित्सेने करता येते.

❑ **शून्याधारीत अर्थसंकल्पाचे तोटे :-**

१. या अर्थसंकल्पासाठी संख्यात्मक माहिती, आर्थिक स्थितीचे पूर्ण ज्ञान, पूर्वानुमानाची क्षमता इत्यादी माहितीची आवश्यकता असते पण अशी माहिती उपलब्ध असेलच असे नाही.
२. या अर्थसंकल्पासाठी मोठा खर्च कागदपत्रावर होतो.
३. अर्थसंकल्पाच्या कार्याची मोजणी करण्यासाठी निकष उपलब्ध नाहीत.

# केंद्रिय अर्थसंकल्प : २०१६ - १७





## ➢ प्रस्तावना :-

- २०१५-१६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ७.६% वृध्दीदरापर्यंत झेपावली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जागतिक अर्थव्यवस्था मंद असतानाही भारत ही सर्वाधिक उज्ज्वल अर्थव्यवस्था (Bright Spot) ठरविलेली आहे.
- जागतिक मंदी असूनही आणि सलग २ वर्षे मोसमी पावसात १३% ची घट येऊनही भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक वाढ नोंदविली आहे. परकीय चलनसाठा ३५० बिलियन डॉलर म्हणजे आतापर्यंत सर्वाधिक नोंदविला गेला आहे.
- १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक स्त्रोतांमध्ये ५५% ची वाढ झाली असली, तरी २०१५-१६ मधील योजनाखर्चाचा आकडा कमी न होता वाढला आहे.

## ❖ २०१६-१७ मधील आव्हाने :-

- जागतिक मंदीचे वाढते सावट व प्रक्षुब्धता
- ७ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी आणि एक दर्जा एक पेन्शन (OROP – One Rank One Pension) लागू केल्यास तिजारीवर पडू शकणारा ताण.




## ➢ आराखडा आणि अग्रक्रम :-

१. अर्थव्यवस्थेवर आणि लोकांच्या जीवनावर लक्षणीय परिणाम करण्यासाठी 'परिवर्तन' (Transform India) अग्रस्थानी असेल.
२. खालील ९ क्षेत्रांना अग्रक्रम देण्यात येणार आहे.
३. कृषी आणि शेतकरी कल्याण
४. ग्रामीण क्षेत्र
५. सामाजिक क्षेत्र
६. शिक्षण, कौशल्य व रोजगारनिर्मिती
७. पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक
८. वित्तीय क्षेत्र सुधारणा
९. प्रशासन सुधारणा व व्यवसाय सुलभता
१०.राजकोषीय शिस्त
११.कर सुधारणा

## ❖ कृषी आणि शेतकरी कल्याण (Agriculture & Farmers Welfare) :-



- कृषी आणि शेतकरी कल्याणासाठी ३५,९८४ कोटी रु. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेची अभियान तत्त्वांवर अंमलबजावणी केली जाईल. २८.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणले जाईल. दीर्घकाळ अपुरे राहिलेले सुमारे ८९ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी (वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम – AIBP – Accelerated Irrigation Benefit Program) अंतर्गत गती दिली जाईल.
- मार्च २०१७ पर्यंत सर्व १४ कोटी शेतक्षेत्रांपर्यंत 'मृदा आरोग्य कार्ड' (Soil Health Card) योजना पोहोचविण्यात येईल.
- 'परंपरागत कृषी विकास योजना' आणि 'ईशान्यपूर्व प्रदेशासाठी जैविक मूल्य शृंखला विकास' मार्फत जैविक खत वापरास प्रोत्साहन देण्यात येईल. 'पशुधन संजीवन', 'नकुल स्वस्थ्य पत्र', 'इ-पशुधन हाट' आणि 'राष्ट्रीय जनुक केंद्र (National Genomic Centre)' या चार डेअरीसाठीच्या प्रकल्पांसाठी ८५० कोटी रु. खर्च केले जाणार.

## ❖ ग्रामीण क्षेत्र (Rural Sector) :-



- १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायती आणि नगरपालिकांना सुमारे २.८७ लाख कोटी रुपयांची अनुदाने दिली जाणार.
- श्यामाप्रसाद मुखर्जी रुर्बन मिशन अंतर्गत २०१६-१७ मध्ये ३०० ग्रामीण समूहांचा विकास करण्यात येईल.
- १ मे २०१८ पर्यंत १००% गावांचे विद्युतीकरण केले जाईल.
- प्रत्येक जिल्ह्यात केंद्रीय व केंद्रपुरस्कृत योजनांचे परीक्षण व अंमलबजावणीसाठी एक जिल्हास्तरीय समिती स्थापन केली जाईल.

## ❖ सामाजिक क्षेत्र आणि आरोग्य सेवा (Social Sector including health & care) :-

- दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना LPG कनेक्शन पुरविण्यासाठी सुरुवातीला २००० कोटी रु. खर्च केले जाणार.
- प्रतिकुटुंब एक लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा पुरवू शकेल अशी नवीन 'आरोग्य विमा योजना' सुरु करण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांसाठी हा आरोग्य विमा ३०,००० रुपयांनी जास्त (एकूण १.३ लाख रु.) असेल.
- २०१६-१७ मध्ये प्रधानमंत्री जनऔषधी योजनेंतर्गत ३००० औषधी दुकाने उभारली जातील. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर 'राष्ट्रीय डायलिसिस सेवा कार्यक्रम' सुरु करण्यात येणार.




- उद्योगांचे सहाय्य घेऊन 'राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती हब (hub)' उभारले जाईल. पंडित दीनदयाल उपाध्याय यांची १०० वी व गुरु गोविंदसिंग यांची ३५० वी जयंती साजरी करण्यासाठी १०० कोटी रु. खर्च केले जाणार.

## ❖ शिक्षण, कौशल्य आणि रोजगारनिर्मिती (Edication, Skill & Job Creation) :–




- ६२ नवीन नवोदय विद्यालये उभारली जातील.
- सर्व शिक्षा अभियानाद्वारे 'शिक्षण गुणवत्तेवर' अधिक लक्ष केंद्रित केले जाईल.
- शाळा सोडल्याचा दाखला, पदवी प्रमाणपत्रे, मार्कशीट व इतर प्रमाणपत्रे डिजिटल पध्दतीने देता यावीत, यासाठी एक Digital Depository तयार केली जाणार.
- EPFO (Employees' Provident Fund Organisation) मध्ये पहिल्या ३ वर्षांत नोंदणी करणाऱ्या नव्या रोजगारीतांना भविष्यनिर्वाह निधीसाठी केंद्र सरकार ८.३३% सहाय्य करणार. यासाठी २०१६-१७ मध्ये १००० कोटी रु. खर्च होणार आहेत.
- राष्ट्रीय करिअर सेवा (National Career Service) अंतर्गत मार्च २०१७ पर्यंत १०० करिअर केंद्रे उभारली जाणार.

## ❖ पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक (Infrastructure & Investment) :-



- २०१६-१७ मध्ये रस्ते क्षेत्रांवर (प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेवरील खर्चासह) ९७००० कोटी रु. खर्च होणार.
- २०१६-१७ मध्ये १०,००० कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय महामार्गांना मान्यता दिली जाणार.
- सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वाच्या पुनरुज्जीवनासाठी २०१६-१७ मध्ये लोकोपयोगी (वादनिपटारा) विधेयक (Public Utility (Resolution of Disputes) Bill) मांडले जाणार, या तत्त्वांतर्गत सवलत करार करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या जाणार व पायाभूत प्रकल्पांसाठी नवीन पतदर्जा (Credit Rating) यंत्रणा उभारली जाणार.
- विमा, पेन्शन, संपत्ती पुनर्रचना कंपन्या (Asset Reconstruction Companies) आणि शेअर बाजार (Stock Exchange) यांमधील परकीय थेट गुंतवणूक (FDI) धोरणात सुधारणा केली जाणार. भारतात उत्पादित झालेल्या अन्नपदार्थांच्या 'विपणन सेवे' (FIPB-Foreign Investment Promotion Board) मार्फत १००% परकीय थेट गुंतवणुकीस मान्यता दिली जाणार.

## ❖ वित्तीय क्षेत्र सुधारणा (Financial Sector Reforms) :-




- चलनविषयक धोरण चौकट आणि चलनविषयक धोरण समिती यांना वित्तविधेयक २०१६ द्वारे वैधानिक दर्जा देण्यात येईल.
- वित्तीय क्षेत्राच्या माहितीचे व्यवस्थापन करणारे केंद्र (Financial Data Management Centre) उभारण्यात येईल.
- वस्तू वायदे बाजारांसाठी सेबीद्वारे नवीन विकल्प उत्पादने विकसित केले जातील.
- नियमबाह्य ठेवी योजनांवर आळा घालण्यासाठी एक सघन केंद्रीय कायदा केला जाईल.

## ❖ प्रशासन आणि व्यवसाय सुलभता (Governance & Ease of doing business) :-




- विविध मंत्रालयांमधील मानव संसाधनाच्या परिमेयकरणासाठी एक कृतीदल स्थापन करण्यात आले आहे. स्वायत्त मंडळांचा सघन आढाव घेतला जाईल व परिमेयकरण (rationalisation) केले जाईल.
- विविध सबसिडी, लाभ व सेवांचा लक्ष्यित लाभ आधार चौकटीमार्फत देण्यासाठी आधार योजनेला वैधानिक पाठबळ देण्यासाठी विधेयक मांडले जाईल.
- खत सबसिडी प्रायोगिक स्तरावर थेट खात्यात हस्तांतरित केली जाईल.
- मार्च २०१७ पर्यंत ३ लाख रेशन दुकानांमध्ये ऑनलाइन यंत्रणा बसविल्या जातील.

## ❖ राजकोषीय शिस्त (Fiscal discipline) :-

- राजकोषीय तूट २०१५-१६ मध्ये ३.९% आणि २०१६-१७ मध्ये ३.५% राखली जाईल.
- २०१५-१६ मधील महसुली तुटीचे लक्ष्य २.८% वरुन २.५% वर आणले गेले आहे.




- २०१६-१७ साठी अर्थसंकल्पीय खर्चाचा आकडा १९.७८ लाख कोटी रु. आहे.कृषी, सिंचन, सामाजिक क्षेत्र, आरोग्य, महिला व बालविकास, अनुसूचित जाती-जमाती-अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पायाभूत सुविधा या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाईल.
- २०१७-१८ पासून योजनाखर्च आणि बिगरयोजना खर्च अशी विभागणी बाद करण्यात येईल.
- कोणतीही नवीन योजना सुरु करताना ती कधीपर्यंत राबविली जाईल आणि तिचा फलनिष्पती आढावा (outcome review) कसा घेतला जाईल हे आधीच स्पष्ट केले जाईल.
- FRBM (Fiscal Responsibility & Budget Management) कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली जाईल.

## ❖ करसुधारणा (Tax Reforms) :–




- GAAR (General Anti Avoidance Rules) १ एप्रिल २०१७ पासून लागू करणार.
- स्थिर व अंदाजयोग्य करयंत्रणा निर्माण करण्यासाठी, काळा पैसा कमी करण्यासाठी शासन कटिबंध्द आहे. विविध मंत्रालये लावत असणारे जवळपास १३ उपकर (Cess), ज्यांतून ५० कोटी रुपयांपेक्षा कमी महसूल मिळतो ते बाद केले जाणार आहेत.
- लहान करदात्यांसाठी, त्यांचा अनुवृत्ती खर्च वाचावा, या उद्देशाने e-Sahyog ही डिजिटल प्रणाली राबविली जाणार आहे.
- आगामी काळात ७ मोठया शहरांमधील सर्व करदात्यांच्या डिजिटल करमूल्यमापनासाठी e-assessment राबविली जाणार आहे.

### अ) आयकर (Income Tax) :-




- आयकर कायदा कलम ८७A नुसार ५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावरील आयकरातून २००० रुपयांचा करपरतावा (tax rebate) मिळत असे. या अर्थसंकल्पात तो ५००० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- आयकर कायदा कलम ८०GG नुसार घरभाडे द्यावे लागत असल्यास उत्पन्नापैकी वार्षिक कमाल २४००० रुपयांचे उत्पन्न करमुक्त होते. या अर्थसंकल्पात ही कमाल मर्यादा ६०००० रु. वार्षिक करण्यात आली आहे.
- नागरिकाने भारतात विकसित व नोंदणी केलेल्या पेटंटद्वारे जगभरातून कमावलेल्या उत्पन्नावर १०% दराने आयकर.
- राष्ट्रीय पेन्शन योजनेंतर्गत ६० वर्षे वयानंतर जी रक्कम देय असते त्यावर आयकर सवलत असते.
- या रकमेतील ६०% रकमेवर आयकर लावण्याचा निर्णय अर्थसंकल्पीय भाषणात उच्चारण्यात आला होता, परंतु ही बाब अस्पष्ट असल्यामुळे व जनचाचणी आणि तीव्र विरोध यामुळे वित्तमंत्रालयाने दि. ८ मार्च २०१६ ला भाषणातील परिच्छेद १३८ आणि १३९ बाद करुन आयकर लावण्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे.
- वार्षिकीमध्ये गुंतविलेला निधी (ज्यातून पेन्शन मिळत असते आणि जो वारसदाराला मिळतो) वारसदाराला मिळताना आयकरमुक्त केला जाणार.

### ब) निगम कर (Corporate Tax) :-




- सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रमांना आयकर कायदा १९६१, कलम ४४AD अन्वये Presumptive Taxation योजना लागू आहे.
- ही योजना लागू होण्यासाठी उपक्रमांची उलाढाल मर्यादा २ कोटी रु. करण्यात येणार आहे.
- असे व्यावसायिक, ज्यांचा नफा ५०% आहे व ज्यांचे उत्पन्न ५० लाख रुपयांच्या आत आहे त्यांनाही Presumptive Taxation योजना लागू करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१७ पासून घसाऱ्याचे मूल्य ४०% पर्यंत रोखले जाईल.
- संशोधनावर केलेले उत्पन्न, जे करमुक्त असते त्याची मर्यादा १ एप्रिल २०१७ पासून १५०% आणि १ एप्रिल २०२० पासून १००% करण्यात येईल.
- ३१ मार्च २०२० आधी सुरु झालेल्या सेझ प्रकल्पांनाच कलम १०AA अन्वये निगमकरात सूट असेल.

### क) सीमा कर (Custom Duty) :-



- रेफ्रिजरेटेड कंटेनरवरील मूळ आयातशुल्क दर ५% केला जाणार.
- माहिती-तंत्रज्ञानसंबंधित हार्डवेअर, भांडवली वस्तू, संरक्षण उत्पादन, कापड उद्योग, पेट्रोलियम, रसायने, कागद, विमानांची व जहाजांची दुरुस्ती या क्षेत्रांमध्ये स्पर्धात्मकतेस प्रोत्साहन मिळावे व आदाने स्वस्त व्हावीत, या उद्देशाने या उद्योगांसाठी लागणाऱ्या आदानांवरील (inputs) सीमाकर आणि उत्पादनशुल्कात कपात केली जाणार आहे.
- पुढील वर्षापासून (२०१७-१८) प्रमुख बंदरे व विमानतळांच्या ठिकाणी सीमाकर वसूल करण्यासाठी एकल खिडकी म्हणून Custom Single Window Project सुरु करण्यात येणार आहे.

### ड) उत्पादन शुल्क (Excise Duty) :-




- रेफ्रिजरेटेड कंटेनरवरील उत्पादन शुल्क ६% केले जाणार.
- बांधकामाच्या जागी तयार केलेल्या काँक्रीट मिक्सवर उत्पादन शुल्क आकारले जात नाही. बांधकामाच्या ठिकाणी न बनविलेले (म्हणजे बाहेरुन बनवून आणलेले) काँक्रीट मिक्स उत्पादन शुल्काच्या जाळ्यात होते. आता त्यावरही उत्पादन शुल्क सवलत दिली जाणार.
- छोटया पेट्रोल – LPG-CNG कारवर १% दराने, डिझेल कारवर २.५% दराने व मोठया गाडयांवर ४% दराने पायाभूत उपकर (Infrastructure cess) आकारला जाणार आहे.
- कोळसा, लिग्नाइट व पिट यांवरील 'स्वच्छ ऊर्जा उपकर' २०० रु. टनवरुन ४०० रु. प्रतिटन करण्यात येणार आहे. विडी वगळता इतर तंबाखू उत्पादनांवरील मूळ उत्पादन शुल्काचा दर १०% वरुन १५% करण्यात येणार आहे.

### इ) सेवाकर (Service Tax) :-




- दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने स्थापन केलेल्या समीक्षा मंडळांनी (Assessing Bodies) दिलेल्या सेवा सेवाकर मुक्त राहतील.
- National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disability या संस्थेने अक्षम, मतिमंद व बहुविकलांग 'निरामय आरोग्य विमा योजना' सुरु केली. या योजनेंतर्गत दिलेल्या विमा सेवा या सेवाकरमुक्त राहतील.
- केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या योजना तसेच सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत बांधल्या जाणाऱ्या ६० वर्गमीटरपर्यंतच्या घर बांधणीवर सेवाकर मुक्तता राहील. १ जून २०१६ पासून सर्व सेवांवर ०.५% दराने 'कृषी कल्याण उपकर' (Krishi Kalyan Cess) आकारला जाणार आहे. या उपकरातून उभारलेला निधी कृषीक्षेत्राच्या सुधारासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वापरला जाईल.

## केंद्रिय अर्थसंकल्प : २०१७ - १८



## ➢ प्रस्तावना :-

- गेल्या अडीच वर्षात 'प्रशासन' हे स्वनिर्णय आणि तरफदारी आधारित यंत्रणेऐवजी पारदर्शक, नीतिपूर्वक आणि व्यवस्थाधारित झाले आहे. चलनवाढ आटोक्यात आली आहे. CPI आधारीत चलनवाढीचा दर जो जुलै २०१६ मध्ये ६% होता, डिसेंबर २०१६ मध्ये ३.४% वर आला.
- अर्थव्यवस्था तीव्र वृध्दीकडे झेपावत आहे. २०१५-१६ मध्ये चालू खात्यावरील तूट (CAD) १% (ते १.३%) होती. ती २०१६-१७ च्या पहिल्या सहामाहीत ०.३% झाली. जागतिक स्तरावरील परकीय थेट गुंतवणुकीत ५% ची घट झाल असली, तरी २०१५-१६ च्या पहिल्या सहामाहीपेक्षा २०१६-१७ च्या पहिल्या सहामाहीत भारतातील परकीय थेट गुंतवणुकीत (FDI) ३६% ची वाढ नोंदविली गेली.
- परकीय चलनसाठा २० जानेवारी २०१७ ला ३६१ बिलियन डॉलर नोंदविला गेला. काळ्या पैशाविरुध्द युध्द छेडले गेले आहे. सार्वजनिक गुंतवणूकीवर परिणान न करता राजकोषीय दृढीकरणाचा मार्ग चालू ठेवण्यात आला आहे.
- छोटी आर्थिक संकटे येऊनही भारतीय अर्थव्यवस्था सुदृढ राहिलेली नाही. IMF ने वर्तविल्याप्रमाणे भारत २०१७ मधील वेगवान अर्थव्यवस्थांपैकी एक ठरेल.
- २०१७-१८ अर्थसंकल्पात ३ मोठया सुधारणा करण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला मांडणे.
- साधारण अर्थसंकल्प आणि रेल्वे अर्थसंकल्प विलीन करणे. नियोजित आणि बिगरनियोजित खर्च वर्गीकरण बाद करणे.

## ❖ २०१७-१८ मधील आव्हाने :-

- मागील वर्षातील मोठया आर्थिक आणि राजकीय घडामोडींमुळे जागतिक अर्थव्यवस्थेसमोर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. अमेरिकन मध्यवर्ती बँक (फेडरल बँक) २०१७ मध्ये धोरण दरांमध्ये (Policy Rates) कपात करण्याची शक्यता असल्यामुळे अमेरिकेतून उभरत्या अर्थव्यवस्थांमध्ये येणारा भांडवली ओघ कमी होईल तर, उभरत्या अर्थव्यवस्थांमधून अमेरिकेकडे भांडवल वळेल.
- वस्तूंच्या किंमतींमधील अनिश्चितता, विशेषत: कच्च्या तेलाच्या किंमतीमधील अनिश्चितता, यामुळे उभरत्या अर्थव्यवस्थांच्या राजकोषीय स्थितीवर परिणाम होतोय.
- वस्तू, सेवा आणि व्यक्ती स्तरावरील जागतिकीकरणाची पीछेहाट होण्याची चिन्हे दिसताहेत.

## ❖ २०१६-१७ मधील मोठया सुधारणा :-

- GST साठीचे घटनादुरुस्ती विधेयक संमत आणि घटनादुरुस्ती लागू.
- मोठया नोटांचे विमुद्रीकरण. विमुद्रीकरणामुळे आर्थिक क्रिया मंद होतील. परंतु हा परिणाम अल्प असेल. विमुद्रीकरणामुळे दीर्घकालीन फायदे होतील. जसे : भ्रष्टाचार कमी होईल, डिजिटल अर्थव्यवस्थेस प्रोत्साहन मिळेल, वित्तीय बचत होईल, बँकांकडील जास्तीच्या तरलतेमुळे कर्जे स्वस्त होतील, अर्थव्यवस्थेला अधिक उचित स्वरुप प्राप्त होईल.
- कायदे :- दिवाळखोरी आणि नादारी कायदा, रिझर्व्ह बँक कायद्यातील चलनवाढ केंद्रित दुरुस्त्या, आधार कायदा

## ❖ आराखडा आणि अग्रक्रम :-

- २०१७-१८ साठी 'TEC India' हा अजेंडा असेल. TEC म्हणजे "Transform (परिवर्तन), Energise (चेतना) आणि Clean (स्वच्छता)
  - परिवर्तन : शासनाची गुणवत्ता आणि लोकांच्या आयुष्याच्या गुणवत्तेत परिवर्तन करायचे आहे.
  - चेतना : समाजातील विविध घटक, विशेषत: तरुण आणि असुरक्षित गटांमध्ये चेतना निर्माण करावयाची आहे आणि त्यांना पूर्ण क्षमता वापरण्याच्या संधी पुरवायच्या आहेत.
  - स्वच्छता : देश भ्रष्टाचार, काळा पैसा आणि अवैध राजकीय फंडिंगपासून मुक्त करायचा आहे.
- खालील १० क्षेत्रांना अग्रक्रम देण्यात येणार.

१. शेतकरी
२. ग्रामीण लोक
३. गरीब आणि दुर्लक्षित
४. तरुण
५. पायाभूत सुविधा
६. वित्तीय क्षेत्र
७. डिजिटल अर्थव्यवस्था
८. सार्वजनिक सेवा
९. विवेकशील राजकोषीय व्यवस्थापन
१०. कर प्रशासन



### १) शेतकरी (Farmers) :-



- पुढील ५ वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकार कटिबध्द आहे.
- २०१७-१८ मध्ये विक्रमी १० लाख कोटी रुपयांच्या कृषी पतपुरवठयाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
- शेतकऱ्यांना होणारा पतपुरवठा सुलभ करण्यासाठी नाबार्डला पुढील ३ वर्षांसाठी १,९०० कोटी रुपयांचे सहाय्य करुन या रकमेतून ६३,००० कार्यकारी प्राथमिक कृषी पतसंस्थांचे संगणकीकरण करण्यात येईल आणि या संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कोअर बँकिंग यंत्रणेशी जोडल्या जातील.
- प्रधानमंत्री फसल विमा योजनेचे लक्ष्य २०१६-१७ मध्ये एकूण पीक क्षेत्राच्या (Total Cropped Area) ३०%, २०१७-१८ मध्ये एकूण पीकक्षेत्राच्या ४०% आणि २०१८-१९ मध्ये एकूण पीकक्षेत्राच्या ५०% ठरविण्यात आले आहे. योजनेसाठी ९,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- कृषी विज्ञान केंद्रांमध्ये नवीन लघुप्रयोगशाळा (Mini Labs) उभारल्या जातील. यामुळे सर्व ६४८ केंद्रांमध्ये मृदापरीक्षण चाचण्या उपलब्ध होऊन १००% क्षेत्रांत चाचण्या होऊ लागतील.
- नाबार्डअंतर्गत उभारला गेलेला २०,००० कोटी रुपयांचा 'दीर्घकालीन सिंचन निधी' (LTF-Long Term Irrigation Fund) आता ४०,००० कोटी रुपयांचा केला जाईल.
- 'प्रत्येक थेंबामागे अधिक पीक' (Per Drop More Crop) यासाठी नाबार्डअंतर्गत एक स्वतंत्र ५,००० कोटी रुपयांचा सूक्ष्म सिंचन निधी (Dedicated Micro Irrigation Fund) उभारला जाईल.
- सर्व ५८५ बाजारांच्या किंवा मंडींच्या (APMC) एकत्रीकरणातून राष्ट्रीय कृषी बाजार (e-NAM) विकसित करायचा आहे. यासाठी प्रत्येक बाजाराला (३० लाख रुपयांऐवजी) आता ७५ लाख रुपयांची मदत डिजिटल पायाभूत सुविधांसाठी केली जाणार.
- राज्यांना करार शेती (Contract Farming) संबंधित कायदे करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल असा मॉडेल कायदा तयार करण्यात येईल. 'डेअरी प्रक्रिया व पायाभूत विकास निधी' नावाने नाबर्डअंतर्गत २,००० कोटी रुपयांचा निधी उभारला जाईल. पुढील ३ वर्षांत हा निधी ८,००० कोटी रुपयांपर्यंत वाढविला जाईल.

### २) ग्रामीण लोक (Rural Population) :-



- ग्रामीण लोकसंख्येला रोजगार आणि मूलभूत सुविधा पुरवण्यावर भर दिला जाईल. केंद्रीय अर्थसंकल्प, राज्य अर्थसंकल्प आणि बँक माध्यमातून स्वयंसहाय्यता गट इत्यादी माध्यमांद्वारे ग्रामीण लोकांवर दरवर्षी अंदाजे ३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होतो.
- २०१९ वर्षातील महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त काही लक्ष्ये ठरविण्यात आली आहेत. जसे २०१९ पर्यंत १ कोटी ग्रामीण कुटुंब दारिद्र्यरेषेतून बाहेर काढणे, २०१९ पर्यंत ५०,००० ग्रामपंचायती दारिद्र्यमुक्त करणे.
- २०१७-१८मध्ये मनरेगा योजनेसाठी ४८,००० कोटी रु. खर्चाची तरतूद
- २०१६-१७ अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी पर्जन्यामिश्रित प्रदेशात ५ लाख शेततळे मनरेगा अंतर्गत उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. चालू २०१७-१८ अर्थसंकल्पात २०१६-१७ चे उद्दिष्ट ५ लाखांऐवजी '१० लाख शेततळे' करण्यात आले असून, ते ३१ मार्च २०१७ पर्यंत पूर्ण करण्याची घोषणा करण्यात आली. २०१७-१८ वर्षात '५ लाख शेततळे' उभारण्याचे नवीन लक्ष्य ठेवण्यात आले. मनरेगा योजनेत महिलांचा वाटा ४८% पेक्षा कमी होता, तो ५५% पर्यंत पोहोचला आहे.
- प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेद्वारे २०११-१४ मध्ये प्रतिदिन ७३ कि.मी. ग्रामीण रस्ते उभारले जात होते. २०१६-१७ मध्ये ही गती १३३ कि.मी. प्रतिदिन झाली. अतिडाव्या विचारसरणीने बाधीत (Left Wing Extermism Affected) तालुक्यांमध्ये १०० पेक्षाही कमी लोकवस्तीचे गाव बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत घेण्यात आले आहे. ही कामे २०१९ पर्यंत पूर्ण केली जातील.
- २०१७-१८ मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेसाठी केंद्रीय तरतूद १९,००० कोटी रुपयांची असून, राज्याचा वाटा मिळविल्यास योजनेवर सुमारे २७,००० कोटी रु. खर्च अंदाजित आहे.
- २०१९ पर्यंत निवाराहित तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत १ कोटी घरे बांधून पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. योजनेसाठी २०१६-१७ मध्ये १५,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ती २०१७-१८ मध्ये वाढविण्यात येऊन २३,००० कोटी रु. करण्यात आली.
- १ मे २०१८ पर्यंत १००% ग्रामीण विद्युतीकरणाची पातळी गाठण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. (योजना-दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना)

- प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती योजना आणि पतसहाय्य योजना यावर केल्या जाणाऱ्या खर्चात तिपटीने वाढ झाली आहे.
- ग्रामीण भारतातील स्वच्छतेचे प्रमाण ऑक्टोबर २०१४ मध्ये ४२% होते, ते ६०% झाले आहे. हागणदारीमुक्त गावांना नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी प्राधान्य दिले जाणार.
- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अभियानांतर्गत एका उपअभियानाद्वारे २८,००० अर्सेनिक आणि फ्लुओराइडबाधित अधिवासांपर्यंत पुढील ४ वर्षांत स्वच्छ पेयजल पुरविण्याचे ध्येय ठरविण्यात आले आहे.
- ग्रामीण क्षेत्रातील व्यक्तींना कौशल्य पुरविण्यासाठी २०२२ पर्यंत ५ लाख व्यक्तींना प्रशिक्षित केले जाईल.
- पंचायतराज संस्थांमध्ये मानव संसाधन विकासासाठी २०१७-१८ मध्ये 'निकालासाठी मानव संसाधन सुधारणा' कार्यक्रम सुरु केला जाईल. ग्रामीण, कृषी आणि संलग्न क्षेत्रासाठी एकूण १,८७,२२३ कोटी रुपयांची तरतूद.

## ३) गरीब आणि दुर्लक्षित (The Poor and The Underprivileged) :-

- सामाजिक सुरक्षा, आरोग्य आणि परवडण्याजोगे घराला प्रोत्साहन दिले जाईल.
- एकात्मिक बालविकास प्रकल्पातील १४ लाख अंगणवाडी केंद्रांमध्ये 'महिला शक्ती केंद्र' उभारले जातील. यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद. यामुळे ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणाच्या सर्व संधी तसे कौशल्यविकास, रोजगार, डिजिटल साक्षरता, आरोग्य आणि पोषण एकाच ठिकाणी एकवटतील.
- संस्थात्मक प्रसूती करणाऱ्या आणि बालकांना लसीकरण करणाऱ्या मातांच्या बँकखात्यात ६,००० रुपये मातृत्व लाभ थेट हस्तांतरीत करण्यात येईल. (योजना-इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना)
- परवडण्याजोगे घर (Affordable Housing) या घटकाला 'पायाभूत सुविधा' दर्जा दिला जाणार आहे. यामुळे या क्षेत्रात गुंतवणूक वाढू शकते.
- राष्ट्रीय गृह बँक (National Housing Bank) २०१७-१८ मध्ये वैयक्तिक गृहकर्जासाठी २०,००० कोटी रुपयांचा पुनर्वित्त पुरवठा करेल.
- काला आजाराचे २०१७ पर्यंत, हत्तीपायाचे २०१७ पर्यंत, कुष्ठरोगाचे २०१८ पर्यंत, गोवरचे २०२० पर्यंत आणि क्षयरोगाचे २०२५ पर्यंत उन्मलून करण्यासाठी केंद्र सरकारने कृती आराखडा तयार केला आहे.
- शिशू मृत्यूदर (Infant Mortality Rate) २०१९ पर्यंत २८ वर आणि मातामृत्यू प्रमाण (Maternal Mortality Ratio) २०१८-२०२० पर्यंत १०० वर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.
- द्वितीय आणि तृतीय स्तरावर तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध होण्यासाठी दरवर्षी नव्याने ५००० पदव्युत्तर जागा निर्माण केल्या जातील.
- झारखंड आणि गुजरातमध्ये प्रत्येकी एक अशा दोन AIIMS सारख्या संस्था उभारल्या जातील.
- सध्या अस्तित्वात असलेल्या श्रम कायद्यांमध्ये सरलता, सुसूत्रता आणि विलीनकरण करुन चौपदरी कायद्याची (४ codes) निर्मिती करण्यात येईल. हे ४ विषय म्हणजे १) मजुरी, २) औद्योगिक संबंध, ३) सामाजिक सुरक्षा व कल्याण आणि ४) सुरक्षा व कामाची स्थिती.
- अनुसूचित जातींसाठी केल्या जाणाऱ्या खर्चात २०१६-१७ पेक्षा २०१७-१८ मध्ये ३५% ची वाढ करण्यात आली आहे. अनुसूचित जमातींसाठी ३१,९२० कोटी रुपये आणि अल्पसंख्यांकांसाठी ४,१९५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची माहिती असणारे, आधारसंलग्न स्मार्ट कार्ड विकसित केले जाणार आहेत. २०१७-१८ मध्ये प्रायोगिक स्तरावर १५ जिल्ह्यांमध्ये हा प्रयोग केला जाणार आहे.

## ४) तरुण (Youth) :-



- तरुणांना शिक्षण, कौशल्य आणि रोजगार पुरवून त्यांच्यामध्ये चेतना निर्माण करायची आहे. शाळांमधील वार्षिक शैक्षणिक निष्पादन (Learning Outcomes) मोजण्यासाठी यंत्रणा विकसित केली जाणार.
- ३,४७९ शैक्षणिकदृष्टया मागास तालुक्यांमध्ये माध्यमिक शाळांपर्यंत पोहोच निर्माण होण्यासाठी, मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि गुणवत्ता वर्धनासाठी एक 'नावीन्यता निधी' (innovation funds) उभारला जाईल. या निधीद्वारे स्थानिक नवीनीकरणाला आणि माहिती तंत्रज्ञान वापराला प्रोत्साहन मिळेल.
- गुणवत्ताधारक उच्च शिक्षण संस्थांना अधिकाधिक प्रशासकीय आणि शैक्षणिक स्वायत्तता दिली जाणार.
- ३५० प्रकारचे ऑनलाइन कोर्स उपलब्ध असणारे SWAYAM हे पोर्टल सुरु केले जाईल. कार्यक्रमाची व्याप्ती DTH चॅनलपर्यंत वाढविली जाईल.
- उच्चशिक्षण यंत्रणेतील सर्व प्रवेश परीक्षा घेण्यासाठी National Testing Agency ही स्वायत्त संस्था उभारली जाईल. यामुळे CBSE, AICTE वरचा तेवढा भार कमी होईल.
- देशातील ६०० जिल्ह्यांपेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये 'प्रधानमंत्री कौशल केंद्र' उभारले जातील. देशभरात १०० 'भारत आंतरराष्ट्रीय कौशल केंद्र' (India International Skill Centre) उभारले जातील.

- ४,००० कोटी रु. खर्चून तरुणांच्या जीवनोन्नतीसाठी 'संकल्प' (SANKALP-Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Program) योजना २०१७-१८ मध्ये सुरु केली जाणार. संकल्प योजनेचे संकल्प योजनेचे लक्ष्य ३.५ कोटी तरुणांना बाजाराभिमुख्य प्रशिक्षण देणे राहील.
- कौशल्य प्रशिक्षणाचा पुढचा टप्पा म्हणून २,२०० कोटी रु. खर्चून STRIVE (Skill Strengthening for Industrial Value Enhancement) योजना देखील २०१७-१८ मध्ये सुरु केली जाणार. चामडे आणि चपला-बूट उद्योगांमध्ये रोजगारनिर्मिती करण्यासाठी नवीन योजना सुरु केली जाईल. पर्यटन आणि रोजगारास प्रोत्साहन देण्यासाठी जगभर 'Incredible India २.०' अभियान राबविले जाणार.

## ५) पायाभूत सुविधा (Infrastructure) :-



- पायाभूत सुविधांची कार्यक्षमता, उत्पादकता वाढवून आयुष्यमानाची गुणवत्ता वाढवायची आहे.
- रस्ते, रेल्वे, जल, वायू वाहतुकीसह संपूर्ण वाहतूक क्षेत्रासाठी २०१७-१८ मध्ये २,४१,३८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- रेल्वेवर भांडवली खर्च आणि विकास खर्च अशा एकूण करण्यात आली आहे. यामध्ये केंद्र सरकारच्या तिजोरीतून होणाऱ्या ५५,००० कोटी रुपयांच्या खर्चाचा समावेश आहे.
- रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पुढील ५ वर्षात १ लाख कोटी रुपयांचा 'राष्ट्रीय रेल संरक्षण कोष' उभारला जाणार.
- २०२० पर्यंत ब्रॉडगेज लाइनवरच्या सर्व मानवरहित रेल्वेफाटकांचे उच्चाटन केले जाईल.
- पुढील ३ वर्षांत समग्र परिणामात (throughput) १०% वृध्दी अपेक्षित आहे. निर्देशित कॉरिडोरचे आधुनिकीकरण आणि उन्नयन हा समग्र परिणाम गाठला जाईल.
- २०१७-१८ मध्ये ३५०० कि.मी. रेल्वे लाइन उभारल्या जातील. तसेच किमान २५ रेल्वे स्टेशन पुनर्विकासासाठी निवडले जातील. ५०० रेल्वे स्टेशनमध्ये लिफ्ट आणि एस्कॅलेटर्स उभारुन दिव्यांग व्यक्तींसाठी अनुकूल बनविले जातील.
- मध्यावधी काळात ७००० रेल्वे स्टेशन सौरऊर्जेवर चालविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या ३०० स्टेशनवर सौरऊर्जा वापरली जातेय.
- रेल्वेमध्ये 'Clean My Coach Service' ही मोबाईल आधारीत SMS सेवा सुरु करण्या येईल. डब्यांमधील स्वच्छतेच्या गरजा आणि तक्रार SMS द्वारा नोंदवता येतील. रेल्वे डब्यांबाबतच्या गरजा आणि तक्रारींसाठी 'Coach Mitra' ही एकल खिडकी सेवा सुरु केली जाईल.
- रेल्वे प्रवासाचे खर्चमूल्य, सेवा गुणवत्ता आणि इतर वाहतूक माध्यमांशी असलेली स्पर्धा इत्यादी विचारात घेऊन रेल्वेभाडे ठरवले जाईल.
- मेट्रो रेल्वे प्रकल्पांना वित्तपुरवठा, नवीन प्रतिमानांची अंमलबजावणी, प्रमाणिकरण, देशी हार्डवेअर-सॉफ्टवेअर इत्यादींना मार्गदर्शक ठरेल असे नवीन 'मेट्रो रेल्वे धोरण' घोषित केले जाईल. मेट्रो रेल्वेसंदर्भात कायद्यांचे परिमेयकरण करुन नवीन 'मेट्रो रेल्वे कायदा' संमत केला जाईल. यामुळे खासगी सहभागास आणि खासगी गुंतवणूकीस प्रोत्साहन मिळेल.
- रस्ते, महामार्गांसाठी २०१६-१७ मध्ये ५७,९७६ कोटी रुपये व २०१७-१८ मध्ये ६४,९०० कोटी रु. तरतूद करण्यात आली.
- किनारपट्टयांना जोडणाऱ्या २००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या उभारणीचे आणि विकासाचे काम हाती घेतले जाईल.
- २०१४-१५ ते २०१६-१७ या ३ वर्षांत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व इतर योजना मिळून १,४०,००० कि.मी. लांबीचे रस्ते उभारले गेले. हे प्रमाण त्यामागील ३ वर्षांपेक्षा जास्त आहे.
- Tier-२ शहरांमधील निवडक विमानतळ सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) तत्त्वावर कार्यचालन आणि देखभालीसाठी हाती घेतले जातील.
- 'भारतभेट' अंतर्गत २०१७-१८ अखेर १.५ लाख ग्रामपंचायतीपर्यंत ऑप्टिकल फायबर जोडणी पुरवून उच्चगती ब्रॉडबँड सेवा उपलब्ध केली जाईल. डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे टेलिमेडिसीन, शिक्षण, कौशल्य पुरविण्यासाठी 'डिजीगाव' (DigiGaon) उपक्रम सुरु केला जाईल.
- ओडिशातील 'चंदीखोल' आणि राजस्थानातील 'बिकानेर' अशा २ ठिकाणी कच्चे तेलाचे साठे उभारले जातील. यामुळे शासकीय तेल साठवण क्षमता १५.३३ मिलियन टनापर्यंत पोहोचेल.
- सौरपार्क विकासाचा दुसरा टप्पा सुरु केला जाईल. या टप्प्यात नवीन २०,००० मेगावॅट क्षमता ऊर्जाक्षमता प्राप्त केली जाईल.
- भारताला इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रात वैश्विक हब बनविण्याच्या उद्देशाने M-SIPS, EDF सारख्या योजना कार्यरत आहेत. २०१७-१८ मध्ये या योजनांसाठी ७४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- २०१७-१८ मध्ये निर्यातीसाठीच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी TIES (Trade Infrastructure for Export Scheme) ही नवीन योजना सुरु करण्यात येईल.

## ६) वित्तीय क्षेत्र (Financial Sector) :-

- मोठया संस्थांच्या माध्यमातून आर्थिक वाढ आणि स्थैर्यासाठी प्रयत्न केले जातील. FIPB (Foreign Investment Promotion Board) मंडळ २०१७-१८ मध्ये बरखास्त केले जाईल. तसेच परकीय थेट गुंतवणूक (FDI) धोरणाचे आणखी उदारीकरण केले जाईल.
- कृषी क्षेत्रातील वस्तू व्यापारासाठीचे वायदेबाजार आणि डेरिव्हेटिव्ह बाजारांचे एकत्रीकरण होण्यासाठी कार्यकारी आणि कायदेशीर चौकटीची आवश्यकता आहे. या चौकटीच्या निर्मितीसाठी आणि अभ्यासासाठी एक तज्ज्ञ समिती स्थापन केली जाईल. (e-NAM – e-National Agriculture Market) हा राष्ट्रीय कृषी बाजार या चौकटीचा अविभाज्य भाग असेल.




- नियमबाह्य ठेवी योजनांवर आळा घालण्यासाठीचे विधेयक मांडले जाईल. चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात वित्तीय संस्था संबंधित विधेयक मांडले जाईल. यामुळे आपल्या वित्तीय यंत्रणेत स्थिरता आणि लवचिकता येईल.
- पायाभूत सुविधांशी निगडित बांधकाम करार, सार्वजनिक खासगी भागीदारी करार (PPP), सार्वजनिक वापर करार या करारांमधील वादांचा निपटारा करण्यासाठी संस्थात्मक उभारणीची गरज आहे. यासाठी १९९६ च्या Arbitration and Concilliation Act या कायद्यात दुरुस्ती केली जाईल.
- सार्वजनिक तसेच खाजगी वित्त क्षेत्रातील सायबर सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी CERT-Fin(Computer Emergency Response Team for our Financial Sector) उभारली जाईल. ही यंत्रणा वित्तीय क्षेत्र नियामक आणि वित्तीय संस्थांमध्ये समन्वय साधेल.
- विविध केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रम (CPSEs) शेअर बाजारात सूचीकृत करण्यासाठी सुधारित प्रक्रिया, कालावधी आणि पध्दत घोषित केली जाईल. रेल्वे उद्योगातील सार्वजनिक क्षेत्र उपक्रम जसे - IRCTC, IRFC, IRCON शेअर बाजारात स्वीकृत केले जातील.
- सार्वजनिक क्षेत्रातील सर्व तेल उद्योगांच्या एकत्रीकरणातून एक 'मोठी तेल कंपनी' (Oil Major) विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला जाईल. ही मोठी तेल कंपनी देशी, खासगी तसेच आंतरराष्ट्रीय तेल कंपन्यांशी स्पर्धा करतील.
- २०१७-१८ मध्ये सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील शेअर्स तसेच इतर शासकीय रोख्यांमधील गुंतवणुकीसाठी विविधीकृत आणि नवीन ETF (Exchange Trades Funds) घोषित केले जातील.
- इंद्रधनुष कार्यप्रणालीनुसार २०१७-१८ मध्ये (सार्वजनिक क्षेत्रातील) बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी १०,००० कोटी रुपयांची तरतूद केली जाईल.
- प्रधानमंत्री मुद्रा योजनेन्वये २.४४ लाख कोटी रुपयांच्या कर्जपुरवठयाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यामध्ये दलित, आदिवासी, मागास आणि महिलांना प्राधान्य दिले जाईल.

## ७) डिजिटल अर्थव्यवस्था (Digital Economy) :-



- शीघ्र, जबाबदार आणि पारदर्शक अर्थव्यवस्थेसाठी डिजिटल क्रांती आवश्यक आहे.
- (बजेट सादर होण्याच्या तारखेपर्यंत) १.२५ लाख लोकांनी BHIM ॲप वापरायला सुरुवात केलेली होती. BHIM च्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी आणखी दोन योजना सुरु करण्यात येतील –
- व्यक्तींसाठी – RBS (Referral Bonus Scheme)
- व्यापाऱ्यांसाठी – CS (Cashback Scheme)
- AEPS (Aadhar Enabled Payment System) आधारीत 'Aadhar Pay' ही व्यापारानुकूल प्रणाली सुरु केली जाईल.
- UPI (United Payement Interface), USSD (Unstructured Supplementary Service Data), Aadhar Pay, IMPS (Immediate Payment Service) आणि डेबिट कार्ड इत्यादी माध्यमांद्वारे होणाऱ्या कॅशलेस व्यवहारांची संख्या २०१७-१८ मध्ये २,५०० कोटींपर्यंत पोहोचण्यासाठी एक अभियान सुरु करण्यात येईल.
- एका विशिष्ट रकमेपलीकडच्या शासकीय जमा डिजिटल पध्दतीनेच स्वीकारण्याची नियमावली विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.
- मार्च २०१७ अखेरपर्यंत बँकांनी १० लाख नवीन POS उपकरण (Point of Sale Terminals) लावण्याचे लक्ष ठेवले. बँकांना सप्टेंबर २०१७ पर्यंत २० लाख आधार आधारित POS उपकरण लावण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.
- सध्या देणी आणि व्यवहारांच्या निरसनासाठी रिझर्व्ह बँकअंतर्गत 'देणी आणि निरसन यंत्रणा नियमन व परीक्षण मंडळ' (Board for Regulation & Supervision of Payment & Settlement Systems) कार्यरत आहे. या मंडळाऐवजी 'देणी नियामक मंडळ' (Payements Regulatory Board) स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

## ८) सार्वजनिक सेवा (Public Service) :-



- प्रभावी प्रशासन आणि लोकसहभागातून प्रभावी सेवा प्रदानास महत्त्व दिले गेले आहे.
- सरकारी इ-बाजार आता वस्तू आणि सेवांची खरेदी करतो. जागतिक बँकेच्या South Asia Procurement Innovation Awards साठी या बाजाराची निवड करण्यात आली.
- मुख्य पोस्ट कार्यालये आता पासपोर्ट सेवा देणार आहेत.
- सैनिक आणि संरक्षण अधिकाऱ्यांना ऑनलाइन प्रवास तिकिटांची नोंदणी करण्यासाठी केंद्रीकृत रक्षा यात्रा प्रणाली (Centralised Defence Travel System) विकसित करण्यात येईल. संरक्षण क्षेत्रातील पेंशनधारकांसाठी वेब आधारीत पेंशन वितरण प्रणाली (Pension Disbursement System) विकसित करण्यात येईल.
- न्यायाधीकरणांची (Tribunals) वाढती संख्या आणि अतिव्याप्ती विचारात घेता न्यायाधीकरणांचे संख्यात्मक सुसूत्रीकरण करण्यात येईल व आवश्यक तेथे न्यायाधीकरणांचे एकत्रिकरण करण्यात येईल. चंपारण्य सत्याग्रह (१०० वर्ष पूर्ण) आणि खुर्दा (ओडिशा) उठाव (२०० वर्ष पूर्ण) यांच्या स्मरणार्थ कार्यक्रम-उत्सव आयोजित केले जातील.

## ९) विवेकशील राजकोषीय व्यवस्थापन (Prudent Fiscal Management) :-



- स्त्रोतांचा इष्टतम वापर आणि राजकोषीय स्थिरता यावर भर दिला जाईल.
- मागील वर्षापेक्षा या वर्षात भांडवली खर्चात २५.४% वाढ करण्यात येणार आहे. २०१६-१७ अर्थसंकल्पानुसार राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या स्त्रोतांचा आकडा ३.६० लाख कोटी रुपये होता. २०१७-१८ मध्ये हा आकडा ४.११ लाख कोटी रुपये राहील.
- पहिल्यांदाच सर्व मंत्रालये आणि विभागांचा मिळून ‘दृढीकृत फलनिष्पत्ती अर्थसंकल्प’ (Consolidated Outcome Budget) सादर करण्यात आला आहे.
- नवीन FRBM समितीने पुढील ३ वर्षांसाठी ३% राजकोषीय तुटीच्या लक्ष्याची शिफारस केली आहे. शाश्वत कर्जलक्ष्य व सार्वजनिक गुंतवणुकीची गरज विचारात घेता ‘२०१७-१८ साठी ३.२% राजकोषीय तुटीचे लक्ष्य’ ठरविण्यात आले आहे. त्यापुढील वर्षात (२०१८-१९) ३% चे लक्ष्य गाठण्यात येईल.
- २०१६-१७ मध्ये ४.२५ लाख कोटी रुपयांचे निव्वळ बाजार कर्ज (Net Market Borrowings) घेणे अंदाजित होते. २०१७-१८ मध्ये हा आकडा ३.४८ लाख कोटी रुपये अंदाजित आहे.२०१६-१७ अर्थसंकल्पात महसुली तूट २.३% अंदाजिण्यात आली होती. सुधारित अंदाजानुसार (Revised Estimate) ही तूट २.१% राहण्याची शक्यता आहे. २०१७-१८ मध्ये महसुली तूट १.९% राखली जाणार आहे. ही तूट FRBM ने सुचविलेल्या २% या पातळीच्या आत आहे.

## १०) कर प्रशासन (Tax Administration) :-




- प्रामाणिकपणास सन्मानित केले जाईल.
- कर सुधारणांसाठी RAPID तत्त्व वापरले जाईल. RAPID म्हणजे Revenue (महसूल), Accountability (जबाबदारी), Probity (सचोटी), Information (माहिती) आणि Digitisation (संगणकीकरण). येत्या वर्षांमध्ये e-assessment वर भर दिला जाईल. कर विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढविण्यात येईल.
- GST परिषदेने (Goods & Services Tax Council) GST च्या जवळपास सर्वच विषयांवर तोडगा काढल्यामुळे चालू वर्षात GST लागू होण्याची पूर्वतयारी झाल्यासारखी आहे.

### A] आयकर (Income Tax) :-




- २.५ लाख रुपये ते ५ लाख रुपये उत्पन्नावरील आयतकराचा दर १०% वरुन ५% करण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. ५० लाख रु. ते १ कोटी रुपये उत्पन्नावर आता १०% अधिभार आकारला जाईल.
- व्यवसायेत्तर ५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींनी आता साधे एकच पानाचे आयकर विवरणपत्र भरायचे आहे.
- ३ वर्षांच्या आत स्थावर मालमत्ता हस्तांतरित केल्यास त्याचा समावेश भांडवली लाभात घेऊन भांडवली लाभ कराच्या जाळ्यात ते येते. हा कालावधी आता २ वर्षे करण्यात येणार. तसेच भांडवली लाभ मोजण्यासाठीचे आधारभूत वर्ष १९८१ ऐवजी २००१ केले जाणार.
- परकीय संस्थांनी परकीय व्यापारी कर्जे, बाँड्स, सरकारी कर्जरोखे, यातून कमावलेल्या व्याज उत्पन्नावर ५% सवलत असते. ही सवलत ३० जून २०२० पर्यंत चालू ठेवण्यात येणार आहे. तसेच ही सवलत रुपया प्रतिभूती (मसाला बॉड्स) मधून कमावलेल्या व्याज उत्पन्नावरही लागू करण्यात येणार आहे.
- विशिष्ट अपवाद वगळता ३ लाख रुपयांपेक्षा जास्तीचे व्यवहार रोखीच्या स्वरुपात करण्यास मनाई राहील. राजकीय पक्ष एका व्यक्तीकडून कमाल रोख २००० रुपयांनीच देणगी स्वीकारु शकतील. देणग्या स्वीकारताना चेक अथवा डिजिटल व्यवहारांच्या वापरास प्रोत्साहन दिले जाईल.
- रिझर्व्ह बँकेच्या मदतीने ‘निवडणूक बाँड्स’ (electoral bonds) सारख्या प्रतिभूती विकसित केल्या जातील. प्रत्येक राजकीय पक्षाला आयकर कायद्याप्रमाणे विवरणपत्र भरावे लागेल. आयकर विवरण भरल्यानंतर त्यात सुधारणा करायची असेल, तर ती आर्थिक वर्ष संपल्यानंतर १२ महिन्यांच्या आतच करता येईल.

### B] निगम कर (Corporate Tax) :-

- Presumptive Taxation योजनेत घोषित केले जाणारे उत्पन्न उलाढालीच्या ८% समजले जात होते, ते ६% केले जाणार.
- सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम ज्यांची वार्षिक उलाढाला कमाल ५० कोटी रुपये आहे. त्यांना केवळ २५% निगमकर (+अधिभार व उपकर) द्यावा लागेल. (इतरांना तो ३०% द्यावा लागतोय)




- स्टार्टअप उद्योगांना पहिल्या ५ वर्षांपैकी ३ वर्षे निगमकरात १००% सवलत दिली होती. आता ही १००% सवलत पहिल्या ७ वर्षांपैकी ३ वर्षे अशी करण्यात येईल. MAT Credit वापरण्याचा कमाल कालावधी १० वर्षे आहे, तो १५ वर्षे करण्यात येईल.
- मागील अर्थसंकल्पात परवडण्याजोगे घराच्या प्रोत्साहनासाठी १००% कर मुक्तता होती.
- यासाठी घरांचा आकार ४ महानगरांमध्ये कमाल ३० वर्गमीटर बिल्टअप क्षेत्रफळ व इतर शहरांमध्ये कमाल ६० वर्गमीटर बिल्टअप क्षेत्रफळ असा निर्धारित करण्यात आला होता. चालू अर्थसंकल्पात ही क्षेत्रफळे बिल्टअप (Built Up) विचारात न घेता कार्पेट (Carpet) क्षेत्रफळे विचारात घेण्याचे ठरविण्यात आले.

### C] सीमा कर (Custom Duty) :-




- m-POS (Point of Sale-miniaturised) साठी लागणारे कार्ड रीडर, १.५.१ जातीचे मायक्रो ATM, फिंगर प्रिंट रीडर व स्कॅनर, डोळ्यांच्या बाहुल्यांचे (Iris) स्कॅनर व इतर सुटे भाग आयात करण्यासाठी आयातकरात १००% सवलत दिली जाणार.
- LNG वरील मूळ आयात शुल्काचा दर ५% वरुन २.५% केला जाणार.




## रेल्वे अर्थसंकल्प मांडणी २०१७ – १८ पासून बंद




- १९२४ पासून केंद्रीय अर्थसंकल्पासोबत वेगळा रेल्वे अर्थसंकल्प मांडला जात असे. २०१७-१८ पासून ही प्रथा बंद करण्यात आली. १९२१ मध्ये विल्यम ॲकवर्थ या ब्रिटिश रेल्वे अर्थतज्ज्ञाच्या अध्यक्षतेखाली भारतीय रेल्वेसंदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली होती.
- या समितीच्या शिफारशीनुसार रेल्वेची पुनर्रचना करण्यात येऊन रेल्वेचे हिशेब खाते १९२४ पासून केंद्रीय खात्यापासून वेगळे करण्यात आले. केंद्रीय हिशेबात एकटया रेल्वेचा हिशेब ७०% ते ८०% असल्यामुळे त्याचा हिशेब वेगळा करण्यात आला. त्यामुळे राजकोष आणि रेल्वेकोष असे कोषाचे विभाजन झाले. या दोन्ही कोषांसाठी १९२४ पासून वेगवेगळे म्हणजे केंद्रीय अर्थसंकल्प (वित्तमंत्र्यांद्वारे) आणि रेल्वे अर्थसंकल्प (रेल्वेमंत्र्याद्वारे) मांडले जाऊ लागले.

## शेजारी रेल्वे अर्थसंकल्प आणि केंद्रीय अर्थसंकल्प यांचा संबंध जोडणारे चित्र रेखाटले आहे. या चित्रावरुन रेल्वे अर्थसंकल्पाचे स्वरुप कसे होते आणि त्यात काय त्रुटी होत्या ते खालीलप्रमाणे मांडता येईल :-

१. रेल्वेकोषातील जमा आणि खर्चाचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वी स्वत: रेल्वेमंत्री मांडत असत. हा अधिकार इतर कुठल्याही सार्वजनिक उद्योगाला नव्हता किंवा इतर कुठल्याही मंत्रालयाला नव्हता.
२. रेल्वे अर्थसंकल्पावर जनमानसात अधिकाधिक चर्चा होत असल्यामुळे व्यावसायिक उद्दिष्टांपेक्षा राजकीय छाप पाडण्यावर अधिक लक्ष दिले जात असे. त्यामुळे कित्येक वर्षे रेल्वेला भाडेवाढ ज्या गतीने करता आली असती ती करता आली नाही.
३. रेल्वेकोषाचा अर्थसंकल्प महसुली खात्यावर संतुलित असला, तरी भांडवली खात्यावर असंतुलित होता. त्यामुळे एकूण जमा कमी आणि खर्च जास्त होता. हा तोल साधण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पातून रेल्वेला दरवर्षी ठराविक भांडवली कर्ज दिले जात असे.
४. विशेष म्हणजे केंद्राने एखाद्या मंत्रालयाला दिलेली मदत हा मंत्रालयावर केलेला खर्च असे आणि रेल्वेला दिलेली मदत ही रेल्वे मंत्रालयाला दिलेले कर्ज असे. उदाहरणार्थ – २०१५-१६ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पातून रेल्वेला ३५,००० कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले. केंद्राचा रेल्वेवरील कर्जाचा आकडा आता २.७५ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला होता.
५. या कर्जापोटी रेल्वे दरवर्षी केंद्राला सरासरी १०,००० कोटी रुपये लाभांश व व्याज देत असे. उदाहरणार्थ – २०१५-१६ रेल्वेने केंद्राला ८,७०० कोटी रुपये लाभांश व व्याज दिले.
६. रेल्वेचा एकूण १३.३ लाख कर्मचारी वर्ग व १३.८ लाख पेंशनधारक आहेत. २०१५-१६ मध्ये रेल्वेने कर्मचारी वर्गाच्या वेतनावर सुमारे ९३,००० कोटी रुपये खर्च केले आणि पेंशनधारकांसाठीच्या पेंशनवर सुमारे ४५,००० कोटी रुपये खर्च केले. आगामी काळात जर केंद्राने सातवा वेतन आयोग जाहीर केला, तर रेल्वेकोषाचा अर्थसंकल्प महसुली खात्यावरही असंतुलित झाला असता.
७. १९२४ मध्ये रेल्वे अर्थसंकल्पाचे आकारमान विचारात घेता ते केंद्रीय अर्थसंकल्पाच्या ७० ते ८०% होते. अलीकडे ते केवळ १० ते १५% झाले होते.

- वर उल्लेखित विविध कारणांमुळे रेल्वे आर्थिकदृष्टया संकटात सापडण्याची शक्यता होती. त्यामुळे हा रेल्वेकोष राजकोषाच्या अधीन करणे आवश्यक बनले. तसेच रेल्वे अर्थसंकल्प वेगळा सादर करण्याचे कुठलेही प्रबळ कारण उरले नाही.
- रेल्वे मंत्रालयाने स्थापन केलेल्या विवेक देबरॉय समितीने जून २०१५ मध्ये सादर केलेल्या अहवालात स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प बाद करण्याची शिफारस केली होती.
- तसेच विवेक देबरॉय व किशोर देसाई यांनी संयुक्तपणे प्रकाशित केलेल्या 'Dispensing with the Railway Budget' या लेखातून स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प बाद करण्याची शिफारस केली होती.
- या सर्व शिफारशी व परिस्थितीचा आढावा घेऊन २०१७-१८ पासून केंद्र सरकारने स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प बाद करण्याचा निर्णय घेतला.

## स्वतंत्र रेल्वे अर्थसंकल्प बाद झाल्यामुळे काय झाले आहे ?

१. रेल्वे जमा आणि खर्चाचा हिशेब रेल्वे मंत्रालयाकडे राहिलाय. (जसा प्रत्येक मंत्रालयाचा स्वत:कडे असतो.) विविध मंत्रालयांच्या अनुदान मागण्या केंद्रीय अर्थसंकल्पादरम्यान मांडल्या जातात. त्या मागण्यांमध्ये आता रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागणीची भर पडली आहे.
२. केंद्राने रेल्वे मंत्रालयाला दिलेली मदत ही आता केंद्राचा खर्च (expenditure) झाली आहे. रेल्वेवरील कर्ज (liability) नव्हे.
३. रेल्वे मंत्रालय हे केंद्रीय खर्चाच्या टप्प्यात आल्यामुळे रेल्वे केंद्राला जो लाभांश किंवा व्याज देत असे ते आता यापुढे देण्याची गरज राहिलेली नाही.
४. रेल्वेच्या येऊ घातलेल्या आर्थिक संकटात केंद्राचा राजकोष सहभागी झाल्यामुळे रेल्वेवरील संकट विरल झाले आहे.
५. जमा आणि खर्च याचा हिशेब एखाद्या ONGC सारख्या सार्वजनिक उद्योगाचा जसा स्वत:कडेच राहतो. तद्वत रेल्वेचा स्वत:कडे राहणार आहे.
६. त्यामुळे रेल्वेने कमावलेले भाडयासारखे व्यावसायिक उत्पन्न हे रेल्वेकडेच राहील. ते केंद्राच्या करेतर महसुलात दिसणार नाही.
७. केंद्राच्या वार्षिक वित्तीय विवरणातील आकडे यामुळे बदललेले नाहीत.

# सार्वजनिक कर्ज

- देशातील सरकारी खर्च भागविण्यासाठी काही वेळा सरकारने चालू महसुल रुपाने एकत्र केलेले उत्पन्न कमी पडते. तसेच भांडवली खर्च भागविण्यासाठी सरकारच्या चालू खात्यावर शिल्लक बाकी राहीलच असे नाही. काही वेळा सरकारला उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करावा लागतो. असा अधिकचा खर्च पूर्ण करण्यासाठी शासन सर्वसामान्य जनतेकडून किंवा देशी संस्थाकडून कर्ज घेते. त्यास अंतर्गत कर्जे असे म्हणतात. जर तसे कर्ज विदेशातून उभे केलेले असले तर त्यास बाह्य कर्ज असे म्हणतात. सार्वजनिक कर्जासंबंधी काही अर्थशास्त्रज्ञांची मते किंवा विचार
- **ॲडम स्मिथ :–** सरकारने कर्जे उभारण्यास सुरुवात केल्यास सरकारची राजकीय सत्ता वाढते. कारण सरकारला कराच्या साधनावर अवलंबून राहावे लागत नाही सार्वजनिक कर्जामुळे सरकार युद्धावर अनावश्यक खर्च करु शकते व सरकार बेजबाबदार बनते.
- **प्रा.माल्थस, प्रा. मिल, प्रा. क्रेनक्रॉस –** यांच्या मते, सार्वजनिक कर्ज हे फार वाईट नसते. उपभोग, उत्पादन, विभाजन आदींना चालना देण्यात सार्वजनिक कर्जाची भूमिका महत्त्वाची ठरते.
- **सार्वजनिक कर्जाचे प्रमाण वाढल्यास पुढील परिणाम घडून येऊ शकतात किंवा येतात.**

१. सातत्याने वाढणाऱ्या सार्वजनिक कर्जामुळे लोकांचा सरकारच्या आर्थिक क्षमतेवरील विश्वास कमी होतो.
२. कर्ज फेडण्यासाठी सरकार जास्त करांची आकारणी करते. त्यामुळे लोकांची बचत व गुंतवणूक क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.
३. अल्पमुदतीचे कर्ज मोठया प्रमाणात उभे करण्यामुळे देशात भाववाढीची समस्या निर्माण होऊ शकते.
४. सार्वजनिक कर्जामुळे आर्थिक विषमता वाढते
५. सार्वजनिक कर्ज वाढीमुळे व्याजदर वाढून जुने कर्ज रोखे विकण्यास लोकांना चालना मिळते यामुळे संबंधित कर्ज रोख्यांच्या किंमती घटण्याची शक्यता निर्माण होते.

## ❖ सार्वजनिक कर्जाचे विविध प्रकार –

१. **अंतर्गत कर्ज –** सरकार देशातील नागरिकांकडून व संस्थांकडून जे कर्ज घेते त्यास अंतर्गत कर्ज म्हणतात.
२. **बाह्य कर्ज –** सरकार परकीय नागरिक, परकीय संस्था व परकीय सरकार यांच्याकडून जे कर्ज घेते त्यास बाह्य सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.
३. **ऐच्छिक कर्ज –** व्याजदर, कर सवलती, परतफेडीची मुदत या गोष्टी फायदेशीर वाटल्या म्हणून लोक जेव्हा स्वखुशीने सरकारला कर्ज देतात तेव्हा त्यास ऐच्छिक कर्ज असे म्हणतात.
४. **सार्वजनिक कर्ज -** आर्थिक आणीबाणी किंवा युद्धजन्य स्थितीत सरकार लोकांकडून सक्तीचे सार्वजनिक कर्ज घेते तेव्हा त्यास सक्तीचे सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.
५. **उत्पादन सार्वजनिक कर्ज –** औद्योगिक प्रकल्प किंवा उत्पादक सेवांच्या निर्मितीसाठी जेव्हा सरकार कर्ज उभे करते त्यास उत्पादक सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.
६. **अनुत्पादक सार्वजनिक कर्ज –** युद्ध खर्चासाठी घेतलेले सार्वजनिक कर्ज अनुत्पादक सार्वजनिक कर्ज असते.
७. **सार्वजनिक कर्जाचे मुदतीनुसार प्रकार –**
   - ज्या सार्वजनिक कर्जाची परतफेड १ वर्षाच्या आत केली जाते त्यास अल्पमुदतीचे सार्वजनिक कर्ज असे म्हणतात. ज्या सार्वजनिक कर्जाची परतफेड १ वर्ष ते ५ वर्ष या कालावधीसाठी असते. तेव्हा ते सार्वजनिक कर्ज मध्यम मुदतीचे असते.
   - ज्या सार्वजनिक कर्जाची परतफे ड ५ वर्षापेक्षा अधिक काळानंतरची असते त्या सार्वजनिक कर्जास दीर्घ मुदतीचे सार्वजनिक कर्ज म्हणतात.

| आधुनिक अर्थशास्त्र तज्ञांच्या मते. सार्वजनिक कर्जाचे स्वरुप खाजगी कर्जा पेक्षा भिन्न असते कारण - | सार्वजनिक कर्जाचे पुढील परिणाम होऊ शकतात – |
|---|---|
| १. कर्जातील बदल शासनास आर्थिक धोरणाचे साधन म्हणून वापरता येते.<br>२. सार्वजनिक कर्जाची परतफेड सरकार सहजपणे व्यवस्थापनाने करु शकते. हे खाजगी कर्जदारास शक्य नाही.<br>३. सार्वजनिक कर्जामुळे लोकांना बचतीची सवय लागते.<br>४. मंदीच्या काळात सार्वजनिक कर्ज कमी करण्यासाठी कर महसुलाचा वापर केल्यास बेकारी वाढेल व भाववाढ कमी होईल. | १. कर्जाच्या पुढच्या पिढीवर अधिक भार पडतो.<br>२. या कर्जामुळे इतर महसूली खर्चावर मर्यादा येतात.<br>३. सार्वजनिक कर्जानेही दिवाळखोरी होऊ शकते.<br>४. या कर्जामुळे भाववाढ होते.<br>५. या कर्जामुळे व्याजदर वाढतात व खाजगी गुंतवणूक कमी होऊ शकते. |

## सार्वजनिक खर्च

- सरकारमार्फत जो खर्च केला जातो त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात. केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय. शांतता, सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था, अंतर्गत सुरक्षा व्यवस्था, शिक्षण, आरोग्य, रस्त्यांवरील दिवे, शहरातील स्वच्छता, कल्याणकारी योजना इत्यादी संबंधी जो खर्च केला जातो. त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात. जे. एम.केन्स – सार्वजनिक खर्च हा अर्थव्यवस्थेचा पायाभूत आधार आहे.
- **सार्वजनिक खर्चाची उद्दिष्टये :-**

१. समाजाचे अधिकाधिक सामाजिक कल्याण प्रस्थापित करणे.
२. मानवी जीवन सुरक्षित करणे

| सार्वजनिक खर्चाची कार्ये | सार्वजनिक खर्चाची कारण | सार्वजनिक खर्च वाढण्याची कारण |
|---|---|---|
| १. साधन सामग्रीने पुनर्वाटप व बाजारातील अपूर्णता दूर करणे.<br>२. साधनसामग्रीच्या पुनर्वाटपासाठी अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उपाय योजणे.<br>३. आर्थिक स्थिरता निर्माण करुन व्यापार चक्रातील चढ उतार टाळणे.<br>४. सामाजिक हितासाठी व्यापारी कृती व्यवस्थित सुरु ठेवणे. | १. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाला खर्च करावा लागतो.<br>२. रस्ते, दळणवळण साधने, पोलीस व्यवस्था इत्यादीमुळे खर्च वाढतो.<br>३. उच्चशिक्षण, प्रशिक्षण व संशोधन यामुळे ही खर्च वाढतो.<br>४. वेध शाळा, कुटूंबनियोजन यासारख्या नव्या कार्याने ही खर्च वाढतो. | १. वाढती लोकसंख्या<br>२. नागरीकरण<br>३. कल्याणकारी राज्याची कल्पना<br>४. लष्कर व संरक्षण रचनेत रचनात्मक बदल करणे<br>५. विकास व नियोजन यासाठी प्रचंड खर्च<br>६. लोकशाही प्रशासन<br>७. नागरी शासन खर्च<br>८. पायाभूत सुविधांमधील वाढता खर्च<br>९. औद्योगिक सुविधांमधील वाढता खर्च<br>१०. भाववाढ |

## लेखा व लेखापरीक्षण



- **अर्थ :-** लेख म्हणजे जमा - खर्च. लेखा परीक्षण म्हणजे जमा - खर्चाची तपासणी. सरकारी लेख व लेखापरीक्षणात सरकारी जमा - खर्च लिहिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लेख्यांसंबंधीचे नियम व या जमाखर्चाची वेळोवेळी तपासणी करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली यंत्रणा यांचा समावेश होतो.
- **या यंत्रणेत पुढील बाबींचा समावेश होतो -**

१. भारताचा नियंत्रण व महालेखापरीक्षक
२. कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंटस्
३. लेखापरीक्षण / अर्थविषयक संसदीय समित्या

| भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक | |
|---|---|
| नेमणूक | • घटनेच्या कलम १४८ अंतर्गत, राष्ट्रपतीतर्फे |
| कार्यकाल | • ६ वर्षे किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत (दोन्हीपैकी जी घटना आधी घडेल तो कार्यकाल) |
| पात्रता | • प्रदीर्घ प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>• लेखे, लेखेपरीक्षण तसेच आर्थिक / वित्तीय व्यवहार याबाबतचे उत्तम ज्ञान. |
| बडतर्फी | • सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशास बडतर्फ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीप्रमाणेच : - संसदेच्या दोन्ही सभागृहांत तशा आशयाचा ठराव त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने तसेच हजर व मतदानात भाग घेणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने संमत झाल्यास व त्यानंतर राष्ट्रपतींनी तसा आदेश काढल्यास CAG पदभ्रष्ट होतो. |
| वेतन | • CAG चे अबाधित स्वातंत्र्य व नि:पक्षपातीपण साध्य करण्यासाठी घटनेत पुढील व्यवस्था आहे.<br>• CAG चे वेतन, सेवाशर्ती, पेन्शन, निवृत्ती वय इ, बाबींमध्ये त्याला प्रतिकूल ठरतील असे कोणतेही बदल करता येणार नाही.त्याच्या निवृत्तीनंतर तो केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या खाली येणाऱ्या कोणत्याही पदासाठी पात्र ठरणार नाही. |

## ❖ कार्ये :

- १९७६ पूर्वी CAG ला दोन प्रकारची कार्ये करावी लागत :-

१. लेखेविषयक कामे
२. लेखेतपासणीविषयक कामे

- मात्र,१९७६ मध्ये "CAG (कर्तव्ये व अधिकार) कायदा – १९७६" संमत करण्यात येऊन CAG ची लेखेविषयक कार्ये काढून घेण्यात आली व त्यांच्याकडे फक्त लेखे तपासणीची कामे देण्यात आली आहेत.

i. भारताच्या, राज्य सरकारांच्या तसेच विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांच्या संचित निधीतून झालेल्या खर्चाचा तपासणी अहवाल तयार करणे. तसेच, हा खर्च कायद्याने ठरवून दिल्याप्रमाणेच झाला आहे की नाही हे बघणे.

- केंद्र सरकारच्या जमा - खर्चाचा अहवाल CAG राष्ट्रपतीला सादर करतात. राष्ट्रपती तो संसदेत मांडण्याचे घडवून आणतात. संसद तो लोकलेखा समितीकडे पाठविते. लोकलेखा समिती त्याचा पूर्ण अभ्यास करुन स्वत:चा केंद्राच्या जमा - खर्चाबाबतच्या दुय्यम अहवाल तयार करते. या अहवालावर संसदेत चर्चा होते. म्हणून CAG ला 'लोकलेखा समितीचे कान व डोळे' असे म्हणतात. तसेच CAG ला 'लोकलेखा समितीचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्वज्ञ' असेही म्हणतात. राज्य सरकारच्या जमा - खर्चाचा अहवाल CAG राज्याच्या राज्यपालाला सादर करतात. राज्यपाल तो विधानसभेत मांडण्याचे घडवून आणतात.

ii. भारताच्या तसेच राज्यांच्या आकस्मिक खर्च निधी व सार्वजनिक लेख्यांमधून झालेल्या खर्चाचा तपासणी - अहवाल तयार करणे.
iii. केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या खात्यांनी केलेल्या व्यापारी, उत्पादन, जमा - खर्च इ. चा तसासणी - अहवाल तयार करणे.
iv. पुढील संस्थांच्या जमा - खर्चाचा तपासणी अहवाल तयार करणे -
   A. केंद्र व राज्य सरकारचे सार्वजनिक उद्योग.
   B. केंद्र किंवा राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा होत असलेल्या संस्था.
   C. इतर महामंडळे किंवा संस्था, जर त्यांच्या संबंधीत कायद्यात तसे म्हटले असल्यास.
v. राष्ट्रपती CAG वर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जमा - खर्चाच्या तपासणीची जबाबदारी सुद्धा सोपवू शकतात.
vi. २००० पासून CAG निर्गुंतवणुकीच्या व्यवहारांची तपासणी करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

- **महालेखापाल दरवर्षी ३ अहवाल राष्ट्रपतींना सादर करतात.**

१. विनियोजन लेख्यांवरील ऑडिट अहवाल,
२. वित्तलेख्यांवरील ऑडिट अहवाल, आणि
३. सार्वजनिक महामंडळांवरील ऑडिट अहवाल

- राष्ट्रपती हे अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याचे घडवून आणतात. त्यानंतर लोकलेखा समिती त्यांचे परीक्षण करते, आणि आपले निष्कर्ष संसदेकडे पाठविते.

- **CAG च्या कार्यावरील मर्यादा :**

१. संचित निधीतून (भारताच्या तसेच राज्यांच्या) काढल्या जाणाऱ्या पैशावर नियंत्रण नसते.
२. CAG चा संबंध फक्त तपासणीच्या टप्प्यावर येतो. तोपर्यंत प्रत्यक्ष खर्च होऊन गेलेला असतो.

## ❖ कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंटस् :-

- ऑक्टोबर १९७६ पासून CAG ची लेखेविषयक कार्ये अर्थमंत्रालयात निर्माण करण्यात आलेल्या CGA च्या कार्यालयाकडे देण्यात आली. सी.जी.ए. हे केंद्र सरकारचे सर्वोच्च 'लेखा प्राधिकारी, आहे.
- घटनेच्या कलम १५० अन्वये केंद्र व राज्य शासनांच्या लेख्यांचे स्वरुप विहित करण्याची जबाबदारी राष्ट्रपतीवर आहे. राष्ट्रपतींच्या या अधिकाराची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सी.जी.ए. यांच्यावर आहे.
- त्यानुसार, केंद्र व राज्य सरकारचे लेखे कोणत्या स्वरुपात ठेवता येतील हे महालेखापालांच्या सल्ल्यानुसार सुचविण्याची जबाबदारी राष्ट्रपतीनी सी.जी.ए. यांच्यावर टाकली आहे.
- CGA हे लेखेविषयक कामा बद्दल भारतसरकारचे प्रमुख सल्लागार म्हणून काम करतात, तसेच कार्यक्षम अशा लेखेविषयक व वित्तीय रिपोर्टिंग सिस्टिमची निर्मिती करण्यासाठी जबाबदार असतात.
- CGA च्या कार्यालयात व्यावसायिक लेखे तज्ज्ञांची नेमणूक केली जाते, ज्यांना विविध शासकीय संस्था व समित्यांमध्ये लेखेविषयक कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहभागी करुन घेतले जाते.

- **कार्ये :**

१. सी. जी. ए. हे भारत सरकारचे मुख्य लेखा सल्लागार असून तांत्रिकदृष्टया योग्य अशी लेखा व्यवस्था प्रस्थापित करणे व राखणे हे त्यांचे प्रमुख कार्य आहे.
२. ते प्रत्येक महिन्याला सरकारच्या खर्च, महसूल, कर्जे व तूट यांचे समिक्षात्मक विश्लेषण तयार करतात.
३. ते संसदेला सादर करण्यासाठी वार्षिक विनियोजन लेखे व केंद्रीय वित्त लेखे तयार करतात.
४. तसेच सरकारच्या जमा - खर्चाच्या नोंदीसाठी योग्य नमुने तयार करणे, सरकारच्या जमा - खर्चाबाबत नियम, नियमावली तयार करणे, त्यांच्यात आवश्यकतेनुसार बदल सुचविणे, ही कार्ये त्यांना करावी लागतात.

## ➢ तुटीचा अर्थभरणा –

- **व्याख्या –** जेव्हा सरकारी खर्च हा चालू महसुलापेक्षा आणि सार्वजनिक कर्ज यांच्या बेरजेपेक्षा अधिक होतो. तेव्हा अतिरिक्त सार्वजनिक खर्च पूर्ण करण्यासाठी सरकार मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेते. त्यास तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात.”

### ❖ तुटीचा अर्थभरणा करण्याच्या पद्धती :–

१. मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेणे.
२. रोख शिल्लक रक्कमा काढून वापरणे.
३. व्यापारी बँकांना सरकारी कर्ज रोखे विकणे.
४. चलन पुरवठयात वाढ करणे.

**❖ तुटीच्या अर्थभरण्याचे हेतू :-** युद्धकाळ, नैसर्गिक संकट किंवा विकासासाठी आर्थिक नियोजन या हेतूसाठी तुटीचा अर्थभरणा केला जातो.

### ❖ तुटीच्या अर्थभरण्याचे आर्थिक परिणाम : -

१. अर्थव्यवस्था अविकसित अवस्थेत असल्यास तुटीच्या अर्थभरण्यामुळे विकासाच्या वेग वाढविणे शक्य होते.
२. तुटीच्या अर्थभरणामुळे चलन पुरवठा वाढून महागाई निर्माण होते.
३. यामुळे रोजगार पातळी व उत्पादनक्षमता वाढते.
४. तुटीच्या अर्थभरण्यामुळे सक्तीची बचत करता येते.
५. तुटीच्या अर्थभरण्याच्या काळात व्यापारी बँकसची पतनिर्मिती वाढते व त्यामुळे भाववाढ अधिक जलद होते.
६. या भाववाढीमुळे समाजात आर्थिक विषमता वाढते.
७. तुटीच्या अर्थभरण्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहार – तोल प्रतिकूल बनतो.
८. तुटीच्या अर्थभरण्यामुळे चलनव्यवस्था अधिक व्यापक बनते.
९. मोठी भाववाढ झाल्यास राजकीय असंतोष निर्माण होतो.

### ❖ तुटीच्या अर्थभरण्याच्या मर्यादा –

- तुटीचा अर्थभरणा करताना अधिक फायदा व कमी दुष्परिणाम साध्य करण्यासाठी पुढील मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

१. देशातील उपयोगात नसलेल्या साधनसामग्रीचे प्रमाण विचारात घेऊन तुटीचा अर्थभरणा करावा.
२. भाववाढ रोखण्यासाठी प्रभावी व कार्यक्षम यंत्रणा असावी.
३. परकीय चलनाचा साठा मजबूत असताना तुटीचा अर्थभरणा करावा कारण भाववाढ नियंत्रण करणे सोपे जाते.
४. तुटीचा उपयोग शक्यतो उत्पादक गुंतवणूकीसाठी केला जावा.
५. तुटीचा अर्थभरणा करताना कर व्यवस्था कार्यक्षम ठेवावी व करांचे दर वाढवावे.
६. सरकारने अनावश्यक व अनुत्पादक खर्च कमी करावा.
७. तुटीच्या काळात बँकिंग क्षेत्रावर मध्यवर्ती बँकेचे प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक आहे.
८. तुटीचा अर्थभरणा करताना सरकारजवळ जीवनावश्यक वस्तूंचा मजबूत साठा असावा.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★